सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १४५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## त्रिभाषा सूत्रासंदर्भात राज्य सरकारचा नवा जीआर

### फेरविचारासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती; ३ महिन्यांत शिफारसी देणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**



त्रिभाषा सूत्रासंदर्भात राज्य सरकारचा नवा जीआर जारी करण्यात आला आहे. त्यानुसार 'पुनर्विचारासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. पूर्वीचे २ जीआर औपचारिकपणे रद्द करण्यात आले आहेत. नव्या जीआरमध्ये उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे माशेलकरांच्या समितीने सादर केलेल्या अहवालाचा अभ्यास ही समिती करणार आहे. तसेच नवी समिती ३ महिन्यांत आपल्या शिफारसी सादर करेल.

राज्य सरकारने त्रिभाषा सूत्र संदर्भातील पूर्वीचे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्यासंदर्भात नवा शासन आदेश(GR)जाहीर केला आहे. या संदर्भात १६ एप्रिल आणि १७ जून २०२५ रोजी जारी झालेले शासन निर्णय आता रद्द झाले आहेत. या जीआरमध्ये मराठी माध्यमातील शाळांमध्ये पहिल्या वर्गापासून तिसरी भाषा म्हणून हिंदी अनिवार्य केली होती, ज्यावर राज्यभर जोरदार विरोध झाला होता. त्यानंतर हे जीआर रद्द करत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती.

या दोन्ही निर्णयांना रद्द करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा प्रकारे समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे म्हटले होते. या वेळी फडणवीस यांनी म्हटले की, मराठी ही आमची प्राथमिक भाषा राहणार आहे. तर नवे जीआर हे केवळ मराठी विद्यार्थ्यांवर केंद्रित धोरणावर आधारित राहील. या निर्णयाबाबत फडणवीस यांनी सांगितले की, ऋ्ठ रद्द करण्यामागील कारण म्हणजे जनभावना, सांस्कृतिक संवेदना, आणि विद्यार्थ्यांवरील भाषिक ओझे लक्षात घेता, हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच ऋ्ठ रद्दीकरणासोबत डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक नविन त्रिभाषा सूत्र पुनर्विचार समिती स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती.

## 'धनुष्य बाण' कुणाचा, उद्धवसेना की शिंदेसेना? १६ जुलैला 'सुप्रीम' सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण या पक्ष चिन्हाच्या अधिकाराविषयी सर्वोच्च न्यायालयात दोन वर्षांनी सुनावणी होणार आहे. २२ फेब्रुवारी २०२३ रोजी दाखल झालेल्या विशेष याचिकेच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती न देता पूर्णनिर्णयापर्यंत पक्ष चिन्हाचा तात्पुरता वापर कायम ठेवण्याचे आदेश दिले होते. आता या प्रकरणी १६ जुलै २०२५ रोजी सुनावणी होणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या सुनावणीकडे पाहिले जात आहे.




या प्रकरणात उद्धव ठाकरे यांच्याविरुद्ध एकनाथ शिंदे यांच्या गटाला पक्षाचे नाव आणि चिन्ह जाहीरपणे देण्यात आले होते. निवडणूक आयोगाच्या १७ फेब्रुवारी २०२३ च्या निर्णयावर ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दाखल केले होते. पक्ष चिन्ह वरील निर्णयावर तात्काळ स्थगिती देण्याच्या ठाकरे गटाच्या अर्जाला कोर्टाने आधीच नाकारले होते. वास्तविक निवडणूक आयोगाने 'बहुमत चाचणी'या निकषावरून शिंदे गटाला पक्षाचे नाव आणि चिन्हाचे अधिकार दिले आहेत.

**उद्धव ठाकरे यांना हवा राष्ट्रवादी सारखा दिलासा**

शिवसेना प्रमाणेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात देखील उभी फूट पडली होती. यातही अजित पवार यांना पक्षाचे नाव आणि चिन्ह मिळाले आहे. मात्र, या प्रकरणाचा निर्णय होईपर्यंत अजित पवार गटाला पक्ष चिन्हाच्या खाली हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात चालू असल्याचा उल्लेख करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार अजित पवार यांच्या पक्षाच्या अधिकृत जाहिरातीमध्ये तसा उल्लेख दिसून येतो. तसाच दिलासा धनुष्यबाण या चिन्हासाठी देखील मिळावा, अशी उद्धव ठाकरे यांना अपेक्षा आहे.

## अमरावतीतील ३१४ ग्रामपंचायतींमध्ये पाच वर्षे असणार महिलाराज

### ७ व ८ जुलै रोजी ग्रा.पं. निहाय काढणार सोडत, जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

ग्रामविकास विभागाने १७ जूनला जाहीर केलेल्या सुधारित सरपंच आरक्षणानुसार अनुसूचित जाती, जमाती, नामाप्र व सर्वसाधारण प्रवर्गात ७२५ ग्रा.पं. मधील महिला राखीव पदांसाठी ७व ८ जुलै आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. तसे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मंगळवारी निर्गमित केले आहेत. यामध्ये संबंधित तहसीलदारांना प्राधिकृत करण्यात आले, तर एसडीओ हे नियंत्रण अधिकारी राहतील.

याबाबतचे राजपत्र ५ मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध झाल्याने पुढील पाच वर्षांकरिता म्हणजेच ४ मार्च २०३० पर्यंत हे आरक्षण कायम राहणार आहे. विशेष म्हणजे सहा महिन्यांत जिल्ह्यातील किमान ५५० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यातच थेट जनतेमधून सरपंच निवडला जाणार आहे. या सरपंचांना कायद्याने अधिक अधिकार बहाल केलेले आहेत. त्यामुळे या पदांसाठी गावागावांत चुरस वाढणार आहे.



जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रात पेसा कायद्याची अंमलबजावणी होत असल्याने चिखलदरा व धारणी तालुक्यातील ११६ सरपंच पदे ही अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत येथे यापूर्वीच महिला आरक्षण निश्चित झाले आहे. याशिवाय जिल्ह्यातील ७२५ ग्रामपंचायतींमध्ये आता ७ व ८ जुलै रोजी महिला आरक्षण सोडत असल्याने प्रशासनासह राजकारणातील हालचाली गतिमान झाल्या आहेत.

**आरक्षण सोडत कार्यक्रम**

७ जुलै रोजी अमरावती, भातकुली, चांदूर रेल्वे, मोर्शी, दर्यापूर व अचलपूर तालुक्यात महिला आरक्षण सोडत होईल. तर ८ जुलै रोजी नांदगाव खंडेश्वर, तिवसा, धामणगाव, वरुड, अंजनगाव सुर्जी य चांदूरबाजार तालुक्यात महिला सरपंचपदासाठी ग्रामपंचायतींचे आरक्षण काढण्यात येणार आहे.

**विषम संख्येचा महिला आरक्षणाला फायदा**

जिल्ह्यात ७२५ ग्रामपंचायतींमध्ये ५० टक्के महिला राखीव याप्रमाणे सरपंचपदाचे आरक्षण निश्चिती होत आहे. यामध्ये ग्रामपंचायतींची संख्या विषम असल्याचा फायदा महिला सरपंचपदाला होत आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत निवडणूक नियम १९६४ नुसार हीपदे आरक्षित करण्यात येईल.

## माझ्याकडून काही चुका झाल्या असतील तर...; भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांचं भावूक पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

भाजपाच्या पक्ष संघटनेत फेरबदल झाले असून कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रदेशाध्यक्षपदावर निवड झाली आहे. चव्हाण यांच्या निवडीनंतर मावळते भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना भावूक पत्र लिहिलं आहे. या पत्रात त्यांनी प्रदेशाध्यक्षपदाच्या काळातील अनुभव आणि संघटनेसाठी केलेल्या कामाचा आढावा मांडला आहे. त्याशिवाय कार्यकर्त्यांची माफीही मागितली आहे.



कार्यकर्त्यांना संबोधित करताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रात म्हटलंय की, कोणती पुण्ये अशी येती फळाला, जोंधळ्याला चांदणे लगडून जावे या कविवर्य ना. धो. महानोरांच्या ओळीसारखी काहीशी भावनिक अवस्था माझी झाली आहे. साधारण ३५ वर्षांपूर्वी कसलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना माझ्यासारख्या सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मी माझ्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. भारतीय जनता पार्टीचा सामान्य कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी भिंती रंगवणे, पत्रके वाटणे, गावोगाव कधी सायकलवर, कधी मोटरसायकलवर, तर पायीच प्रवास करणे इथपासून सुरू झालेला माझा प्रवास भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्ष पदापर्यंत येऊन पोहोचला. हे माझ्यासाठीच अविश्वसनीय आहे. खरोखरच मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता की, कधीतरी भारतीय जनता पार्टीचा राज्याचा अध्यक्ष म्हणून आपण काम करू.

## शेतकऱ्यांच्या आडून राजकारण करू नका, गोंधळ घालू नका, अजितदादांनी विरोधकांना खडसावलं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

शेतकरी हा लाखोंचा पोशिंदा आहे आणि राज्यातलं सरकार शेतकऱ्यांचं सरकार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडवणं, शेतकऱ्यांना मदत करणं सरकारची जबाबदारी असून आमचं सरकार ती पार पाडेलंच. शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार आहे. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करू नये, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात गोंधळ घालू नये असेही अजित पवार म्हणाले.



उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभेत म्हणाले की, विरोधी पक्ष सदस्यांनी सभागृहात गोंधळ घालू नये. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. सरकारकडे सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत. सरकार चर्चेपासून पळ काढणार नाही हे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं आहे. विरोधी पक्षांना त्यांच्या उद्याच्या ठरावात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची संधी आहे.

कोणत्याही परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना एकटे पडू देणार नाही, असे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील बळीराजाच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे असल्याचा पुनरुच्चार केला.






## संपादकीय ......

# मराठीचा बाज वेगळाच!

हिंदी भाषा पहिलीपासून शिकवण्याच्या निर्णयाचा जीआर अखेर शासनाने मागे घेतला आहे. यामुळे कुणी असो की नसो; परंतु पालकांनी मात्र नि:श्वास सोडला आहे. आपली मुले शाळेतून परत आल्यानंतर आपल्याशी मराठीत बोलणार, इंग्रजीत बोलणार की हिंदीत बोलणार, हा मोठाच प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. तूर्त या निर्णयावर पडदा पडला आहे आणि शिवाय पुढे काही होईल, असे काही सांगता येत नाही.

कधीकाळी पाठीवर दप्तराचे ओझे घेऊन जाणार्या विद्यार्थ्यांना, तीन वर्गांना एकत्र शिकवणार्या एकशिक्षकी शाळा होत्या. त्या काळात कुठल्याही प्रकारची उपकरणे, जसे की दृक्श्राव्य माध्यम अथवा स्क्रीन नव्हते. एक गुरुजी असायचे आणि ते तिन्ही वर्गांना एकाच वेळी शिकवायचे. चौथीला बोर्ड असल्यामुळे ज्या गावात तिसरीपर्यंत शाळा आहे, तेथील विद्यार्थ्यांना चौथीसाठी शेजारच्या गावात पायी जावे लागत असे. इथून सुरुवात केलेल्या शिक्षण क्षेत्राचा प्रवास कार्पोरेट क्षेत्रापर्यंत झाला आणि त्यानंतर पंचतारांकित शाळाही उभ्या राहिल्या.

अतिरिक्त भाषा शिकवणारे शिक्षक शासन कुठून आणणार होते, याचा काही शोध लागू शकलेला नाही. आहे तोच अभ्यासक्रम शिकवण्यासाठी शिक्षक पुरेसे नाहीत, तेथे आणखी एक नवा विषय शिकवण्यासाठी शिक्षक कुठून येणार माहीत नव्हते. राजकारण आल्याशिवाय आपल्या राज्यामध्ये कुठलाही प्रश्न मार्गी लागत नाही. या हिंदी भाषेच्या प्रकरणामुळे दोन ठाकरे बंधू एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली. मराठी माणसांची वज्रमूठ किंवा मराठी भाषिकांची गर्जना अशा स्वरूपात घोषणा देत दोन्ही बंधूंनी मिळून एक मोर्चा नव्हे, महामोर्चा काढण्याचे ठरवले. याचे पुढे काय होईल माहीत नाही; परंतु तूर्त शाळकरी विद्यार्थ्यांना मात्र दिलासा मिळालेला आहे. जेमतेम सहा वर्षे पूर्ण केलेले मूल शाळेत जायला लागल्याबरोबर त्याच्यावर अनेक भाषिक संस्कार होत असतात. प्रत्येक विभागातील भाषेचा बाज वेगळा असतो. याचा अर्थ कोल्हापुरात वेगळी मराठी बोलली जाते आणि परभणीत वेगळी मराठी बोलली जाते.

खानदेशातील मराठीचा वेगळाच बाज आहे, तर कोकणातील मराठीचा आणखीच वेगळा असतो. या सगळ्या भाषिक आक्रमणाच्या बरोबर आणखी इतर भाषाही त्यांना शिकाव्या लागतातच. इंग्लिश ही जगाची भाषा असल्यामुळे आज ज्ञानभाषा समजली जाते. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणार्या लोकांनी असे निष्कर्ष काढले आहेत की, मुलांचे चांगले आकलन मातृभाषेतूनच होत असते. मराठी लोकांची मातृभाषा मराठीच आहे, जी घराघरांत सहजतेने बोलले जाते. कधीकाळी सर्व शिक्षण केवळ मराठीत होत असे. त्यासोबत पाचवीला पहिल्यांदा हिंदी आणि इंग्रजी हे विषय येत असत. हळूहळू त्यात चांगली पकड घेत मुले सर्व भाषांवर प्रभुत्व मिळवत असत. मराठी माध्यमातून पूर्ण शिक्षण घेऊन आयएएस, आयपीएस आणि वैज्ञानिक झालेले असंख्य लोक आजही पाहायला मिळतात.

# सोयाबीन पिकांवर संकट; 'ही' फवारणी ठरत आहे रामबाण उपाय वाचा सविस्तर




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप हंगामात सोयाबीनपीक अंकुरले असले तरी पावसाने दडी मारल्यामुळे किडींचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढतो आहे. अशा वेळी रासायनिक औषधांऐवजी स्वस्त, सेंद्रिय आणि पर्यावरणस्नेही ५% निंबोळी अर्काची फवारणी हा शेतकर्यांसाठी रामबाण ठरत आहे.खरीप हंगामात सोयाबीनची पेरणी जोरात सुरू आहे. मात्र काही भागांमध्ये पावसाने अचानक विश्रांती घेतल्यामुळे पिकांवर ताण वाढला असून, कीड व रोगांचा धोकाही वाढला आहे.यावर मात करण्यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी हा एक प्रभावी आणि नैसर्गिक पर्याय ठरत आहे. कृषी विभाग व 'आत्मा' संस्थेच्या तज्ज्ञांनी शेतकर्यांना यासाठी मार्गदर्शन केले आहे.

**सोयाबीनची स्थिती; पाऊस थांबताच कीड-रोगांचा धोका**

राज्यात जून अखेरपर्यंत मोठ्या क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली आहे. काही भागांत पाऊस चांगला झाल्याने पीक अंकुरले असले तरी, नंतरच्या पावसाच्या खंडामुळे कोवळ्या पिकांवर कीड व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढली आहे.

निंबोळी अर्काचा वापर; नैसर्गिक व सेंद्रिय कीड नियंत्रण उपाय

५% निंबोळी अर्क हा कीड व रोग नियंत्रणासाठी अत्यंत उपयुक्त, सेंद्रिय, आणि पर्यावरणस्नेही उपाय आहे. यामुळे पिकांवरील अळी, थ्रिप्स, मावा, पांढरी माशी यासारख्या कीटकांचे नियंत्रण शक्य होते.

**निंबोळी अर्क तयार करण्याची प्रक्रिया**

५ किलो निंबोळी बारीक करून १० लिटर पाण्यात रात्रभर भिजवून ठेवा

दुसर्या दिवशी हे मिश्रण गाळून त्यात ९० लिटर पाणी मिसळा

त्यात २०० ग्रॅम साबणाचा चुरा घालून चांगलं ढवळा

तयार झालेलं १०० लिटर द्रावण एक एकर पिकासाठी पुरेसे ठरतं

**निंबोळी अर्काचे फायदे**

किडींच्या जीवनचक्रात व्यत्यय आणून प्रजनन क्षमता रोखतो

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

सेंद्रिय व सुरक्षित असल्याने जमिनीच्या पोतात सुधारणा

फायदेशीर सूक्ष्मजीवांचे संवर्धन

रासायनिक औषधांपेक्षा स्वस्त, सोपं आणि प्रभावी

पिकांची प्रत आणि उत्पादनक्षमतेत वाढ

सेंद्रिय कीडनाशकांचे महत्त्व

'आत्मा'चे तंत्रज्ञान व्यवस्थापक जयप्रकाश लव्हाळे यांनी सांगितलं की, रासायनिक औषधांचा अतिवापर मातीच्या गुणवत्तेला बाधा पोहोचवत आहे. त्याऐवजी निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, तंबाखू अर्क हे सेंद्रिय उपाय अधिक सुरक्षित आणि दीर्घकालीन फायदे देणारे आहेत.

दशपर्णी अर्क - रोगप्रतिबंधक क्षमता वाढवतो

* तंबाखू अर्क - पाने खाणार्या किडींसाठी प्रभावी

शेतकर्यांसाठी सल्ला

* कोवळ्या पिकांवर कीड-रोग दिसताच ५% निंबोळी अर्काची फवारणी तात्काळ करावी

* फवारणी सकाळी वा संध्याकाळी करावी

* अति पाऊस किंवा सुकाळ अशा दोन्ही स्थितींमध्ये नैसर्गिक उपाय उपयुक्त

* शेतमित्र, कृषी सहाय्यक वा 'आत्मा' केंद्राशी सल्लामसलत करून सेंद्रिय उपाय राबवावेत

निसर्गपूरक शेती आणि उत्पादनाची टिकाऊ गुणवत्ता हवी असल्यास सेंद्रिय उपाय हेच उत्तम. निंबोळी अर्कासारखे स्वस्त आणि प्रभावी उपाय सर्व शेतकर्यांसाठी उपयुक्त ठरतील.




## चाळिशीच्या आतील ५० टक्के रुग्ण हृदयरोगाशी संबंधित

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

भारतात गेल्या काही वर्षांपासून हृदयविकाराच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. ५० टक्के रुग्ण ४० वर्षांच्या आतील असल्याचे एका अमेरिकन संशोधन अहवालातून पुढे आले आहे. यापासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी केवळ व्यायाम करणे पुरेसे नाही, तर तुम्हाला संतुलित जीवनशैलीचा अवलंब करणे आवश्यक आहे. धूम्रपान करणे आणि नियमित मद्यपान केल्याने हृदयविकाराचा धोका खूप वाढतो. तज्ज्ञ यामुळे होणार्या नुकसानीबद्दल लोकांना नेहमीच चेतावणी देत आले आहेत आणि याचे सेवन न करण्याचा सल्लाही देतात.



**वजनावर नियंत्रण** - लठ्ठपणाला अनेक आजारांचे मूळ मानले जाते. हृदयाच्या आरोग्यासाठी शरीरात जमा झालेली अतिरिक्त चरबी देखील जबाबदार असते. यामुळे उच्च रक्तदाब, उच्च रक्तातील कोलेस्ट्रॉल आणि उच्च रक्तातील साखर यांसारखे आजार होऊ लागतात.

**१०० पैकी २८ मृत्यू हृदयरोगाने**

एका अमेरिकन संशोधनानुसार, २०१५ मध्ये भारतात ६.३ कोटी लोक हृदयाशी संबंधित आजारांनी ग्रस्त होते आणि त्यापैकी २.३ कोटी लोकांचे वय ४० पेक्षा कमी होते. त्याचप्रमाणे, २०१८ मध्ये आलेल्या लॅन्सेटच्या अभ्यासादरम्यान १९९० ते २०१६ पर्यंतच्या हृदयरोगाच्या प्रकरणांचा डेटा गोळा करण्यात आला होता. त्यानुसार, १९९० मध्ये भारतातील एकूण मृत्यूंपैकी १५.२ टक्के मृत्यूंना हृदयाशी संबंधित आजार जबाबदार होते. तर २०१६ मध्ये हा आकडा वाढून २८.१ टक्के झाला होता. यानुसार, २०१६ मध्ये भारतात होणार्या प्रत्येक १०० मृत्यूंपैकी २८ मृत्यूंना हृदयाशी संबंधित आजार जबाबदार होते.

**तणावामुळे धोका ६० टक्क्यांपर्यंत**


तणावाला हृदयाच्या समस्यांचे एक महत्त्वाचे कारण मानले जाते. तो केवळ आपल्या मन:स्थितीवरच परिणाम करत नाही, तर आपल्या शरीरासाठीही खूप हानिकारक असतो. रक्तवाहिन्यांवर दीर्घकाळ दबाव पडतो. संशोधकांच्या मते, दीर्घकाळच्या तणावामुळे हृदयाच्या समस्यांचा धोका ६० टक्क्यांपर्यंत वाढतो.

**नियमित व्यायाम**- तज्ज्ञांच्या मते, निरोगी जीवनासाठी दर आठवड्याला किमान १५० मिनिटे सामान्य एरोबिक्स किंवा ७५ मिनिटे वेगवान एरोबिक व्यायाम करणे फायदेशीर ठरू शकते. तथापि, हृदयरोगाने ग्रस्त असलेल्या लोकांना जास्त शारीरिक श्रमाचे व्यायाम न करण्याचा सल्ला दिला जातो.

# जमिनीवर पाय असणारा नेता

राजकारणात यशस्वी होण्यासाठी परिश्रम करावे लागतात. लोकांत राहावे लागतं, तेव्हा लोक स्विकारतात. राजकारण हे सत्ता भोगण्याचं साधन नाही. राजकारणातून समाजकारणाला जोड द्यायची असते. लोकांच्या कामी येणं आणि लोकांच्या समस्या सोडून लोकहिताचे निर्णय घेणे म्हणजे राजकारण आहे. अलीकडच्या काळात राजकारणाला व्यवसायाचं स्वरुप आला. पैसे लावा आणि राजकीय पदे मिळवा असं सुरु झालं. पैसे देवून राजकीय पदे मिळवणारे खुप आहेत, पण अशांचे हे राजकारण जास्त दिवस टिकत नाही. जो पर्यंत एखादं पद आहे तो पर्यंत लोक त्याला स्विकारतात. पद गेल्यानंतर लोक त्या व्यक्तीचं नाव देखील लक्षात ठेवत नाहीत, ज्यांनी ज्यांनी आपल्या राजकारणाची सुरुवात समाजकारणातून केली. त्यांची इतिहासात नोंद झाली. अमरावती जिल्हयाचं राजकारण हे नेहमीच चर्चेत असतं. अमरावतीने अनेक नेते जन्माला घातले. बळवंत वानखडे नाव स्थानिक ग्रामपंचायत सरपंच-जिल्हा परिषद सभापति-विधानसभा आमदार आणि अमरावती लोकसभा खासदार या राजकारणातून पुढे आले,विधानसभेच्या माध्यमातून बळवंतभाऊ यांनी आपले कर्तृत्व दाखवलं. लोकांच्या काय समस्या असतात आणि त्या कशा सोडवल्या पाहिजे याची जाण बळवंतभाऊ यांना पुर्वीपासूनच होती. कारण बळवंतभाऊ हे ग्रामीण भागातील नेते म्हणुन उदयाला आलेले आहेत. बळवंतभाऊ यांनी रिपाई सोडल्यानंतर जेव्हा कांग्रेसमध्ये प्रवेश केला तेव्हा यांचा योग्य सन्मान झाला. आमदार झाल्यावर सभागृहात असतांना मतदारसंघातील हजारो कोटिचा निधी आनला दर्यापुर मतदारसंघ विकासशील करुण जनतेच्या विश्वासाला खरे करुन दाखवलं. एक अभ्यासू बाणा आणि शांत स्वभाव व गरज पड़ली तेव्हा आक्रमक शैली म्हणुन बळवंतभाऊ यांची ओळख झाली. लोकसभेत ते विरोधकांना गारद करत विरोधी पक्ष नेता कसा असावा हे बळवंतभाऊ यांनी महाराष्ट्राला दाखवून दिलं आहे. राज्यातील अनेक प्रश्नांबाबत बळवंतभाऊ यांनी लोकसभेत आवाज उठवला आहे, बळवंतभाऊ यांची शैली तरुणांना भावणारी असल्याने बळवंतभाऊ यांच्याशी मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग जोडला गेला. कांग्रेसने तरुण नेत्यांना संधी दिल्याने याचा फायदा अमरावती लोकसभा निवडनुकित खासदार म्हनून निवडूनआल्यापासून त्यांनी झपाटल्यागत आपल्या कामाला सुरुवात केली. विरोधात असतांना असुन सुद्धा त्यांचा कामाचा धड़का सुरु आहे,अधिक काम करायला सुरुवात जिल्हयाच्या विकासासाठी ते मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देत आहेत. प्रशासनाचा सतत आढावा घेवून कुठल्या कामासाठी किती निधी खर्च झाला आणि भविष्यात कोणते काम करायचे याचं ते नियोजन करत असतात. राजकारणाचे उणे, दुणे न करता जिल्हयाच्या विकासासाठी त्यांची भुमिका सकारात्मक असते. बळवंतभाऊ यांच्याकडे कुठलेही काम घेवून जाणारा माणुस असतो. काम घेवून जाणार्या प्रत्येकांचे समाधान करण्याचं काम बळवंतभाऊ हे करत असतात, मग ते दिल्ली मुंबई असो किंवा अमरावतीअसो. त्यांच्यापर्यंत एखाद्या कामाचा मॅसेज केला तर ते काम तात्काळ मार्गी लावण्याचे काम ते करत असतात. जिल्हयातील पीक विमा, शेतकर्यांचे पीक कर्ज, घरकूल, पाणी पुरवठ्याच्या योजना, रस्ते, यासह अन्य प्रश्नांचा बळवंतभाऊ यांना चांगलाच अभ्यास आहे. त्यामुळे अशा प्रश्नांबाबत ते तात्काळ निर्णय घेत असतात. एखाद्याच्या वस्तीवर जाण्यासाठी रस्ता नसेल, त्या व्यक्तीने बळवंतभाऊ यांच्याकडे मागणी केली तर त्या बाबत ते संबंधीत विभागाला सुचना देवून रस्त्याचा प्रश्न मार्गी लावत आहे. खासदार झाल्यानंतर अनेकांना त्याचा गर्व चढत असतो. काही जण नुसत्या लाल दिव्याच्या गाड्या उडवण्यातच दंग असतात, पण बळवंतभाऊ यांच्या बाबतीत तसं अजुन तरी झालेलं नाही. एखाद्याने बळवंत वानखडे यांना फोन केला तर तो फोन स्वतः बळवंत वानखड़े उचलतात आणि संबंधीत व्यक्तीचं म्हणणं ऐकून घेतात. असाच एक प्रसंग माझ्या मित्राने मला सांगितला. ३ महिन्यापूर्वी कापसाचा प्रश्न होता. शासकीय कापूस केंद्रावर शेतकर्यांच्या कापसाच्या गाड्या तात्काळ रिकाम्या केल्या जात नव्हत्या. ग्रेडरला विनंती करुन ही गाडी खाली होत नसल्याने दर्यापुर तालुक्यातील एका शेतकरी पुत्राने थेट खासदार बळवंतवानखड़े यांनाच फोन लावला. फोन बळवंत भाऊ यांनी उचलला. त्या शेतकरी पुत्राने आपली कैफीयत त्यांच्याकडे मांडली. तुमचं काम होईल असं त्यांनी त्या शेतकरी पुत्राला सांगितलं. पाच मिनिटाने या तरुणास नितेश वानखड़े यांचा फोन आला. नितेशभाऊ यानी खासदार बलवंतभाऊ यांचा रेफरन्स देत त्यांनी त्या तरुणाची कैफीयत ऐकून घेतली व त्या तरुणास सांगितले की, तुम्हाला आता सीसीआयच्या अधिकार्याचा फोन येईल. पाच मिनीटात त्या अधिकार्याचा फोन आला आणि त्या अधिकार्याने तरुणाची तक्रार ऐकून घेत संबंधीत ग्रेडरला तात्काळ त्या शेतकर्यांच्या कापसाची गाडी खाली करून घेण्याची सुचना केली. एका सामान्य तरुणाने बळवंतवानखड़े यांना फोन केल्यांनतर त्याची दखल किती तात्काळ घेतली जाते याचे हे जिवंत उदाहरण आहे. बळवंत वानखड़े यांनी आपली दखल घेतली याचं आज ही या तरुणाला प्रचंड नवल वाटत आहे. तो अभिमानाने बलवंत वानखड़े यांनी आपली घेतलेली दाखल कौतुकाने लोकांना सांगत आहे. कारण हा तरुण काही राजकारणी नाही. त्याच्या कुटूंबात कुणी राजकारण करत नाही. त्याची आणि खासदार बळवंत वानखड़े यांची ओळख ही नाही. तो एक सर्वसामान्य तरुण आहे. एका सामान्य माणसाच्या अपेक्षा पुर्ण करण्याचं काम बळवंत वानखड़े हे करत आहे. त्यामुळे ते लोकांच्या गळ्यातील ताईत होत आहे. असे किती तरी उदाहरणे आहे. जे की, त्यांनी लोकांच्या समस्या तात्काळ सोडवलेल्या आहेत. खासदार असतांना कसलाही आताताईपणा नाही. अहंम नाही, सत्तेची हवा डोक्यात नाही. जितकं समाजहित करता येईल तितकं करण्याचा प्रयत्न ते करत असतात. राजकारणात जो व्यक्ती माणसं जोडत असतो तोच यशस्वी होत असतो. त्यासाठी नेत्यांचे पाय नेहमीच जमीनीवर असायला हवे. खासदार बळवंत वानखड़े यांचे पाय जमीनीवर आहेत म्हणुन ते आज जिल्हातील राजकारणात सुर्यासारखेचमकत आहेत.





**राज माहोरे**
**७०६६२२४७०६**

# धावत्या ट्रेनमध्ये टीसीला कपडे फाडून मारहाण! एलटीटी-हटिया एक्सप्रेसमधील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२नागपूर-** कर्तव्यावर असलेल्या टीसीला एका प्रवाशाने शौचालयात ओढून बेदम मारहाण केली. त्यांचे कपडे फाडले, रक्कम लुटली आणि ओळखपत्रासह महत्वाची कागदपत्रे ट्रेनच्या खाली फेकून दिली. मुंबई-नागपूर रेल्वे मार्गावर एलटीटी हटिया एक्सप्रेसमध्ये ही खळबळजनक घटना घडली. मंगळवारी या घटनेचे वृत्त उघड झाल्यापासून रेल्वे प्रशासनात प्रचंड खळबळ निर्माण झाली आहे.

फिर्यादी टीसी हे ३५ वर्षांचे असून ते अमरावती जिल्ह्यातील रहिवासी आहेत. २९ जूनला सकाळी १० वाजता ते नेहमी प्रमाणे कर्तव्य बजावत होते. बडनेरा स्थानकावर एलटीटी हटिया-एक्सप्रेसमध्ये त्यांना एक प्रवासी विनातिकिट आढळला. प्रवाशाने त्याच्याकडे तिकिट नसल्याचे कबुल करून आपण गाडीत तिकिट बणवू असे म्हणत टीसींना जनरल कोचमध्ये नेले. कोचमधील शौचालयाजवळ जाताच त्याने दार उघडून टीसीला आत ओढले. दार बंद करून टीसीला बेदम मारहाण सुरू केली. एवढ्यात गाडी वर्धेकडे निघाल्याने चालू गाडीच्या आवाजात टीसीची आरडाओरड दबली. दरम्यान, आरोपीने टीसीला बेदम मारहाण करतानाच त्यांच्या जवळचा पेन घेऊन त्यांना शरिरावर ठिकठिकाणी टोचले. एवढेच नव्हे तर आरोपीने त्यांना रक्त निघेपर्यंत कडाडून चावे घेतले. हे करतानाच खिडकीची काच फोडून टीसीजवळचे पैसे हिसकावून घेतले. मोबाईल आणि कागदपत्रांसह रेल्वेचे आयकार्ड हिसकावून ट्रेनच्या खिडकीबाहेर फेकले. टीसीचा गणवेश फाडला.



चिंध्या केलेला शर्ट अंगातून काढत तोसुद्धा बाहेर फेकून दिला.

सहकार्यामुळे बचावले - धावत्या ट्रेनमध्ये हा धक्कादायक प्रकार सुरू असताना दुसरे टीसी विजयसिंह चव्हाण यांना शंका आल्याने त्यांनी प्रवाशांना गोळा करून दार उघडण्यास बाध्य केले. त्यानंतर आरोपी तसेच रक्तबंबाळ अवस्थेतील पीडित टीसीला बाहेर ओढले. चव्हाण यांनी लगेच फोनवरून या घटनेची माहिती रेल्वेच्या वरिष्ठांना दिली.

**वर्धा स्थानकावर आरोपी जेरबंद** - सकाळी १०.४५ वाजता ट्रेन वर्धा स्थानकावर पोहचताच प्रवाशांच्या मदतीने ताब्यात घेतलेल्या आरोपीला रेल्वे पोलिसांच्या हवाली केले. त्यानंतर जखमी टीसीवर उपचार करण्यात आले. या प्रकारामुळे पीडित टीसींना मोठा मानसिक धक्का बसला आहे.

**आरोपी कल्याणमधील रहिवासी** - सिनेस्टाईल खलनायक बनलेल्या आरोपीचे नाव शहजाद शब्बीर शेख (वय ३०) असून तो ठाणे जिल्ह्यातील टिटवाडा (ईस्ट कल्याण) येथील रहिवासी असल्याचे रेल्वे सूत्रांनी सांगितले. त्याला अटक करण्यात आली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २ जुलै २०२५ शहर/ग्रामिण

# बच्चू कडू यांचा जिल्हा बँकेत मनमानी कारभार

## खोटे ठराव, बहुमत नसताना देखील परस्पर मंजूर



## गेल्या दीड वर्षांत बँकेला कोट्यवधींचा चुना

### अध्यक्ष, उपाध्यक्षांना खुल्या चर्चेचे आव्हान

जिल्हा बँकेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार सुरू असताना सत्ताधाऱ्यांकडून बँक सुरळीत सुरू असल्याचा तसेच ठेवी वाढून बँक मोठ्या प्रमाणात नफ्यात असल्याचा दावा केल्या जात आहे. हा दावा फोल असल्याचा आरोप बबलू देशमुख गटाने केला असून बँकेच्या व्यवहाराबाबत त्यांनी समोरासमोर येऊन चर्चा करावी, आम्ही खुल्या चर्चेला तयार आहोत. असे आव्हान रविद्र गायगोले यांच्यासह बबलू देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांना दिले.

### पत्रकार परिषदेतून बबलू देशमुख यांचा आरोप

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२अमरावती**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या गटातील संचालकांकडून उपविधीला डावलून मनमानी कारभार सुरू केला आहे. खोटे ठराव घेणे, कित्येक ठरावाला बहुमत नसताना देखील तेपरस्पर मंजुर करुन घेतले आहे. या दिड वर्ष दुप्पट ते तिप्पट पटीने वस्तु खरेदी करुन तस बांधकाम करुन बँकेला कोट्यवधींचा च लावण्याचा आरोप पत्रकार परिषदेतून कॉर जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केला. यावेळी संचालक रविद्र गायगोले यांनी तसे पुरावें देखील सादर केले.

जिल्हा बँकेतील राजकीय वातावरण आता - पुन्हा तापले आहे. एकमेकांवर आरोप प्रत्योरोपांच्या फेऱ्या झाडल्या जात असतांना मंगळवारी बबलू देशमुख गटातील संचालकांनी पत्रकार परिषदे घेऊन बँकेत सत्ताधाऱ्यांकडून सुरू असलेल्या अवेध कामाकाजाचा लेखाजोखा मांडला. यावेळी बबलू देशमुख म्हणाले, बँकेवर केवळ सात संचालक घेऊन अध्यक्षांनी सत्ताहिसकाविली. त्यानंतर मंत्री असताना त्यांनी अनेक चुकीचे निर्णय घेतले. बँकेत अतिमहत्वा ची असलेली कार्यकारी समिती देखील अवैध पध्दीने गठीत केली. या समितीवर आता नाबार्डने देखील ताशेरे ओढले आहेत. दिड वर्षांपासूनच सत्ताधाऱ्यांविरोधात प्रशासन ते शासनस्तरावर तसेच न्यायालयात देखील तक्रारी प्रलंबित असताना आता यावर निर्णय सुरू झाले आहेत. याचमुळे अध्यक्षांना अपात्र करण्यात आले. यावर न्यायालयाने तात्पुती स्थगिती दिली आहे. परंतु त्यांच्याकडून याचा जल्लोष सुरू असताना हा जल्लोष क्षणिक आहे. कारण यावर सुनावणी होऊन तो रद्द देखील होऊ शकतो, असा आशावाद यावेळी संचालकां कडूनव्यक्त करण्यात आला. संगणक खरेदीमध्ये कोट्यावर्षीचा खर्च करण्यात आला. पदाधिकाऱ्यांचे दालन व्यवस्थीत असताना त्यावर देखील मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. प्रवास भत्ता देय नसताना प्रवास भत्ता काढणे, नियमात नसताना केवळ विमा कंपणीकडून मिळणाऱ्या कमीशन करिता शिक्षकांचा विमा काढणे, असे अनेक प्रकार बबलू देशमुख, रविद्र गायगोले, खा. बळवंत वानखडे, प्रा. वीरेंद्र जगताप, हरीभाऊ मोहोड आदी संचालकांनी पुरव्यानिशी उघड केले. पत्रकार परिषदेला प्रकाश काळबांडे, संजय मार्डीकर आदींची उपस्थिती होती.

# धारणीत अज्ञात वाहनाच्या धडकेत कोल्ह्याचा मृत्यू

## अनेक वाहनांनी चिरडल्याने मृतदेहाची चाळणी

### वनविभागाच्या मुख्यापासून २ कि. मीवर घटनावनविभाग कुंभकर्णी झोपेत

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२धारणी,**धारणी ते खंडवा मार्गावर कुसुमकोट गावाजवळ अज्ञात - वाहनाच्या धडकेत एका कोल्ह्याचादुदैर्वी मृत्यू - झाल्याची घटना रविवारी उघडकीस आली. धडकेनंतर अनेक वाहनांनी चिरडल्यामुळे कोल्ह्याच्या मृतदेहाचे अक्षरशः तुकडे झाले असून हा प्रकार अतिशय धक्कादायक ववेदनादायी आहे. विशेष म्हणजे ही घटना वन विभागाच्या मुख्यालयापासून केवळ दोन किलोमीटर अंतरावर घडली असतानाही वनविभागाचा एकही अधिकारी किंवा कर्मचारी घटनास्थळी पोहोचलेला नाही. त्यामुळे निसर्गप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



माहितीनुसार, धारणी ते खंडवा मार्गावर कुसूमकोट गावाजनीकच्या रस्यावर एका अज्ञात वाहनाने कोल्ह्याला चिरडल्याने त्याचा मृत्यू झाला. त्यानंतरही अन्य वाहनांनी चिरडल्याने कोल्ह्याच्या मृतदेहाचे तुकडे-तुकडे झाले. काही वन्य प्रेमींना ही बाब दिसताच त्यांनी या बाबत वन विभागाला माहिती दिली. तरी देखील वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी घटनास्थळावर येऊन पंचनामा, मृत प्राण्याचा रस्त्यापासून दूर करण्याची किंवा दफन/दाह करण्याची कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे रस्त्यावर प्राणीही सुरक्षित नाहीत, आणि मग जंगलातील वन्यजीव सुरक्षितकसेराहतील, असा संतप्त सवाल निसर्ग व वन्यजीव प्रेमींमधून उपस्थित केला जात आहे.या घटनेमुळे वनविभागाच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मेळघाटातील जंगल परिसरात वन्यजीव संरक्षणासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, मात्र प्रत्यक्षात वन्यजीवांच्या सुरक्षिततेबाबत काय परिस्थिती आहे, हे या घटनेवरून स्पष्ट झाले आहे. कोल्ह्यासारखा लहान प्राणी रस्त्यावर मृतावस्थेत तासन्तास पडून राहतो, आणि कोणी दखल घेत नाही, ही वनविभागाची घोर निष्काळजीपणा दर्शवते. ही घटना केवळ एका प्राण्याच्या मृत्यूपुरती मर्यादित नसून, ती वन्यजीव सुरक्षा व्यवस्थेतील ढिसाळपणा व उदासीनतेचे प्रत्यक्ष उदाहरण ठरत आहे. त्यामुळेसंबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईहोऊन भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, अशी जोरदार मागणी निसर्गप्रेमी व सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे.

# जिल्हा बँकेत बच्चु कडू गटाला पुन्हा धक्का

## संचालक आनंद काळे यांना अपात्रेची नोटिस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष बच्चु कडू यांना मागील महिन्यांत अपात्रेची नोटिस बजाविली असताना त्यांच्याच गटातील संचालक आनंद काळे यांना विभागीय सहनिबंधकांनी सोमवारी अपात्रेची नोटिस बजाविली आहे. याबाबत त्यांना १४ जूलैपर्यंत खुलासा सादर करण्याबाबत आदेशात नमुद आहे.

जिल्हा बँकेमध्ये राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. काही दिवसांपुर्वी बबलु देशमुख गटाचे प्रकाश काळबांडे यांच्या अपात्र केल्याने विरोधकांनी अध्यक्षांविरोधात अपात्रेची कारवाई केली. तर आता लगेच त्यांच्याच गटातील आनंदकाळे यांना अपात्रेची नोटिस मिळाली आहे. बँकेचे संचालक हरीभाऊ मोहोड व इतर ११ संचालक, २१ एप्रिल रोजी संचालक आनंद नंदकुमार काळे यांचेविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८ अ अन्वये कार्यवाही करणेबाबत अर्ज सादर केला होता. ते संचालक पदावर आरूढ झाल्यापासून बँकेचे कामकाज मनमर्जीने व बँकेचे हिताविरुद्ध करणे, त्यांच्या विरुध्द ४२० अंतर्गत गुन्हा दाखल आहे, बँकेचे आर्थिक अपहार तसेच विविध प्रवासभत्यापोटी त्यांनी २ लाख २८ हजार ३२८ रुपयांचे बिल काढले आहे परंतु २१ नोव्हेंबरच्या सभेमध्ये त्यांचा खर्च नामंजूर करून सदरचे खर्च बँकेत जमा करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे त्यांनी अनाधिकृत खर्च केल्याचे सिध्दझाल्याने याचा ठपका ठेवत विभागीय सहनिबंधकांनी त्यांना कलम ७८ अ नुसार अपात्र घोषीत करण्यात का येऊ नये याबाबत नोटिस बजाविली आहे. या नोटिसमुळेबच्चु कडू गटाला चांगलाच धक्का बसला आहे. त्यांना पुढील पाच वर्ष निवडणुक देखील लढता येणार नाही, असे देखील नोटिस मध्ये नमुद आहे. त्यामुळे याचा खुलासा १४ जुलै पर्यंत सादर करावा, खुलासा समाधानकारक नसल्यास आपणाला अपात्र केल्या जाईल असे आदेशात नमुद आहे.

# वरूड शहरातून ४० क्विं. शासकीय तांदुळ जप्त, पुरवठा विभागाचे धाडसत्र

## रेशन दुकानदार व काही लाभार्थींची होणार चौकशी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ वरुड**-शहर व तालुक्यात मोठया प्रमाणात शासकीय तांदुळाची खुल्या बाजारात विक्री होत असल्याची ओरड सुरु आहे. अशातच महसूल विभागातील पुरवठा निरीक्षण अधिकारी निखील नलावडे यांचे कार्यक्षेत्रात वाहनासह ४० क्विंटल शासकीय तांदुळ जप्त करून करून ३ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे स्वस्त धान्य दुकानदारांसह शासकीय तांदुळविकणाऱ्या लाभार्थ्यांचे सुद्धा धाबे दणाणले आहे.

एका खाजगीवाहनाचा पाठलाग करून एम.एच.३१ सी.बी ४५८२ क्रमाकांचे वाहन शहरातील एका गोदामासमोर थांबले असता वाहन चालक आशिष पांडे यांना विचारले असता सदर धान्य कोणाचे व कोठून आणले आहे ? त्यांनी अभिजीत इंगोले (२८) रा.बेनोडा याचे नाव सांगितले. त्यानुसार अभिजीत इंगोले यांना बोलावुन सदर धान्यसाठा कोठुन आणला ? याची चौकशी करुन बयाण नोंदविण्यात आले. त्यानुसार अभिजीत इंगोले यांचे बेनोडा येथील एक किराणा दुकान असुन त्या ठिकाणी परिसरातील राशनकार्ड धारक यांचेकडुन गहु, तांदुळ खरेदी करुन त्या बदल्यात किराणा साहित्य देण्यात येते व सदर एकत्रित धान्यसाठा जमा करुन ठोक व्यापारांकडे विक्री करीत असतो असे सांगितले. त्यामुळे सदर धान्यसाठाप्रथमदर्शनी अवैध असल्याचे आढळुन आले.

त्यानुसार एकुण ८० कट्टे, ४० क्विटल तांदुळ अंदाजे किमत ९२ हजार रुपये व गाडी किमत अंदाजे किमत ३ लाख रुपये असा एकूण ३ लाख ९२ हजार रुपये किमतीचे मुद्देमाल जप्त करण्यात आले. नंतर एम.एच.२७बीएक्स ६४६५ या गाडीमध्ये भरुन माल जप्त करण्यात आला. एकंदरीत अभिजीत नामदेव इंगोले हे राशनकार्ड धारकांकडुन किरकोळ स्वरुपात तांदुळ खरेदी विक्री व्यवहार अवैधपणे करीत असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न होते व तो तांदुळ अभिजीत इंगोले यांनी खरेदी केलेला तांदुळ वरुडयेथील एका व्यापाऱ्याकडे विनापरवाना धान्यसाठा जमा करुन विक्री करीत असल्याचे प्रथमदर्शनी आढळुन आल्यावरून अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ च्या कलम ३ चा भंग करीत असुन कलम (७) नुसार शिक्षेस पात्र आहे.

या प्रकरणी पुरवठा निरीक्षण अधिकारी निखील नलावडे यांचे फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ (३), (७), भा.न्या.सं. २०२३ कलम ३५१ (२), (३) अन्वये अभिजीत नामदेवइंगोले, रा. बेनोडा (शहीद) यांचेसह दोन लोकांविरुद्धगुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कार्यवाही जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसीलदार रविद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पुरवठा निरीक्षण अधिकारी निखील नलवाडे, नायब तहसीलदार पंकज चव्हाण, मंडळ अधिकारी वैशाली मिसाळ, तलाठी पेठे, पवार, बघेले व पोलीस कर्मचाऱ्यांनी केली.

# चादूर बाजार कृषी कार्यालयात १६ तक्रारी

## १५० एकरावर सोयाबीन बियाणे उगवलेच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ चांदूरबाजार,** फोटो घेणेउत्पादन खर्चावर शेतमालाचा भाव मिळत नसल्याने आधीच जेरीस आलेल्या शेतक ऱ्यांवर सोयाबीनचे महागडे बियाणे उगवले नसल्याने नविन आर्थिक संकट ओढवले आहे. चांदूरबाजार तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन बियाणे उगवले नसल्याने त्यांना पुन्हा नव्याने बियाणे खरेदी करुन पेरणी करावी लागणार आहे.३० जुन पर्यंत तालुका कृषी कार्यालयात अशा १६ तक्रारी प्राप्त झाल्या असून २ जुनला तपासणी पथक येणार असल्याची माहीती तालुका कृषी अधिकारी फाल्गुनी ननीर यांनी दिली. चांदूरबाजार तालुक्यातील २० ते २५ शेतकऱ्यांनी बुस्टर कं. आर व्ही एस एम ११३५ जातीचे सोयाबीन बियाणे १५० चे जवळपास खरेदी केले. यात २५ किलोच्या एका बॅगची किमत २१७५ रुपये एवढी आहे. तालुक्यात या बियाणाची २०, २१, २२ जुन दरम्यान १५० एकरावर पेरणी करण्यात आली. यात चांदूरबाजार येथील सुधीर महल्ले यांच्या चांदूरबाजार शिवारातील ४ एकर शेतातील २१ जुनला पेरलेले बियाणे निघालेच नाही. याशिवाय श्रीमतीगजभे, स्वप्निल कोंडे, बोरज, राजेश सिनकर चांदूरबाजार, निखील सिनकर बोरज, साजीदपटेलबोरज, विलासपंचभाई जमापूर आदीसह तुषार बोरेकर यांचे आखदवाडा येथील १० एकर शेतातील सोयाबीनचे बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी सदर शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे दाखल केल्या आहेत.

गेल्या हंगामात सोयाबीन, कापूस, तुर व हरभरा या पिकांना अपेक्षेप्रमाणे भाव मिळाला नसला तरी शेतकयाकडे रोखीच्या पिकांचा पर्याय नसल्याने शेतकऱ्यांनी स्वतःकडील बियाणे न पेरता उगवणक्षमता व उत्पन्नात वाढ होण्याच्या अपेक्षेने नामांकित कं. चे महागडे बियाणे खरेदी केले. कारण गेले वर्षी याच बियाणाचे हिरुळ पुर्णा परिसरात चांगले उत्पादन झाल्याच्या चर्चेने सदरचे बियाणे चांदूरबाजारातील कृषी केंद्रांत उपलब्ध नसल्याने आसेगाव पुर्णा येथील कृषी केंद्रातुन सामुहिक खरेदी केल्याची माहीती पिडीत शेतकरी सुधिर महल्ले यांनी दिली. आता सदरचे बियाणे उगवले नसल्याने याची तपासणी करुन संबंधीत कं, कडुन नुकसान भरपाई देण्याची मागणी या शेतकऱ्यानी कृषी विभागाकडे केली आहे.

### गो.सी. टोम्पे महाविद्यालय आवारातून

# १ लाख २० हजाराची रोकड लंपास फोर व्हीलरची काच फोडून चोरी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२चांदूर बाजार-** चांदूरबाजार शहर व परीसरात घरफोडी, पाकीट मारी, चोरीच्या घटनेत वाढ झाली आहे. गेल्या महिन्यात ८ लाखाची घरफोडी झाली. मंगळवारी दुपारी १ ते २ चेदरम्यान अमरावतीमार्गावरीलगो. सी. टोम्पे महाविद्यालयाच्या आवारात प्राध्यापकाच्या उभ्या असलेल्या लॉक चार चाकी वाहनातून काच फोडुन १ लाख २० हजाराची रोकडअज्ञात चोरट्याने लंपास केले.चांदूर बाजार मधील अमरावती वलगांव मार्गावर असलेल्या गो.सी. टोम्पे महाविद्यालय आहे. महाविद्यालय परिसरातप्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराज वाचनालय समोर उभ्या असलेल्या चार - चाकी वाहन क्र. एम एच २७ ए आर ३१२३ या वाहनात प्रा. जयंत बनसोड यांनी बँक ऑफ महाराष्ट्र मधून काढलेले १ लाख २० हजार रूपये ठेवून गाडी लॉक करुन महाविद्यालयात गेले. गाडीची ड्रायव्हर साईडची काच फोडून चोरट्याने ही रक्कम लंपास केली. वाहन प्रा. रविद्र डाखोरे यांच्या मालकीचे असूनरक्कमप्रा. जयंतबनसोडे यांची आहे. सदर घटनेची तक्रार प्रा. जयंत बनसोड यांनी पोलीस स्टेशन चांदूर बाजार येथे दिलेली आहे. चांदूर बाजार पोलीस घटलेल्या घटनेचा तपास करत आहे.-

# अमरावतीत आमदार चषक कबड्डी स्पर्धा

## ७१ वी विदर्भ राज्य अजिंक्यपद वरिष्ठ गट पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा ४ ते ६ जुलै दरम्यान विभागीय क्रीडा संकुलात आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–**

ॲम्युचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया व कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ, नागपूर यांच्या मान्यताप्राप्त अमरावती महानगर कबड्डी (संघ) असोसिएशन, अमरावतीच्या यजमानपदाखाली ७१ वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट पुरुष व महिला आमदार चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन दि. ४ ते ६ जुलै २०२५ दरम्यान विभागीय क्रीडा संकुल मोर्शी रोड, अमरावती येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत विदर्भातील सर्व प्रमुख महिला व पुरुषांचे संघ सहभागी होणार असून या स्पर्धेतून राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता विदर्भाचा संघ सुध्दा निवडला जाणार आहे. या स्पर्धेत विविध आकर्षक पुरस्कार देण्यात येणार आहे. या स्पर्धेनिमीत्त संपूर्ण राज्यभरातून सुमारे ६०० हून अधिक खेळाडू, पंच, प्रशिक्षक, मार्गदर्शक हे अमरावतीत येत आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन शनिवार दि. ५ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता ज्यांच्या नावाने ही कबड्डी स्पर्धा आमदार चषक म्हणून घेण्यात येत आहे असे बडनेरा विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार तसेच महाराष्ट्र विधीमंडळाच्या आश्वासक समितीचे अध्यक्ष मा. श्री. रविभाऊ राणा यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विशेष अतिथी म्हणून राज्यसभा खासदार मा.श्री डॉ. अनिल बोंडे, धामणगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार मा.श्री प्रतापदादा अडसड, तिवसा विधानसभा मतदार संघाचे आमदार मा. श्री. राजेश वानखडे, अचलपुर विधानसभा मतदार संघाचे आमदार मा. श्री प्रविण तायडे तसेच अखिल भारतीय कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव मा. श्री.ए. उसी रेड्डी आदी उपस्थित राहणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार तसेच कबड्डी असोसिएशन, विदर्भ संघ, नागपूरचे अध्यक्ष मा. श्री. रामदास तडस, वर्धा नगरपालिकेचे उपाध्यक्ष तसेच कबड्डी असोसिएशन, विदर्भ संघाचे सचिव मा. श्री. प्रदिपसिंग ठाकूर, अमरावती विभागाचे क्रीडा उपसंचालक मा. श्री. शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी मा. श्री. गणेश जाधव, भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक शेखर भोयर व माजी नगरसेवक व ज्येष्ठ मार्गदर्शक मा. श्री. वसंतराव साऊरकर यांची उपस्थिती राहणार आहे.

या स्पर्धेचे बक्षिस वितरण ६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी पालकमंत्री मा. श्री प्रविण पोटे, माजी खासदार मा. सौ. नवनित रवि राणा, मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार मा. श्री. उमेश यावलकर, कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव ए. उसी रेड्डी, माजी खासदार व कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ, नागपूरचे अध्यक्ष मा.श्री रामदास तडस, सचिव व वर्धा नगरपालिकेचे उपाध्यक्ष प्रदिपसिंहजी ठाकूर, माजी महापौर विलास इंगोले, ड. प्रशांतजी देशपांडे, सदस्य-ऑलम्पीक असोसिएशन, महा.राज्य, भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, भाजपा शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ नागपूरच्या रेफ्रीबोर्डाचे अध्यक्ष सतिष इखार यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेसाठी येणाऱ्या खेळाडू, पंच, प्रशिक्षक महिला व पुरुष यांची निवास व भोजन व्यवस्था आयोजन समितीतर्फे करण्यात आली आहे. या स्पर्धेदरम्यान विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे.


अमरावती महानगर कबड्डी (संघ) असोसिएशनचे अध्यक्ष विवेक तु. गुल्हाने, सचिव नितीन सराफ, कार्याध्यक्ष संदीप इंगोले, उपाध्यक्ष अतुल इंगोले, योगेश भोसले, कोषाध्यक्ष मिलींद पाटील, सहसचिव राजेश गाडे यांच्यासह कार्यकारीणी सदस्य मिलींद बांबल, धनराज यादव, शरद गढीकर, गणेश वरुडकर, अतुल देशमुख, सतिष ठाकूर, निलेश सराफ, राजेंद्र तुळे, सचिन मेहरे आदी स्पर्धेच्या यशस्वितेकरीता कार्यरत आहे.

स्पर्धेसाठी स्वागत समितीचेही गठण करण्यात आले असून त्यात राजाभाऊ यादगिरे, जयंत कलोती, दिपक गुल्हाने, सुनिल गोगटे, सुरेंद्र चिखलकर, प्रदिप वानखडे, मिलींद बांबल, आप्पासाहेब देशमुख, राजुभाऊ महल्ले, सुनिल वानखडे, सुरेश दम्माणी, सर्जेराव भिडे आदी काम पाहत आहे.

# सोमवार बाजार येथील मासविक्री व अतिक्रमण १५ दुकानांवर मनपाची कार्यवाही

## अनधिकृत मासविक्री बाबत मा.आयुक्त यांचे कठोर कार्यवाही बाबतचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती –** मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत दौरा करीत असतांना अतिक्रमण, साफ सफाई व शहरात उघड्यावरील कत्तल व मास विक्री बाबत तक्रारीची नोंद घेऊन शहरातील कत्तल व मास विक्री तात्काळ बंद करावी. याबाबत बाजार परवाना विभाग, अतिक्रमण विभाग, पशुसंवर्धन विभाग संबधीत अधिकाऱ्यांना तात्काळ सुचना दिल्या. तसेच महानगरपालिका हद्दीमध्ये अधिकृत बाजार याचे व्यतिरिक्त इतर ठिकाणी होणारी मास विक्री याबाबत कठोर कार्यवाही करावी. जेणे करुन सार्वजनिक आरोग्य व त्यावर होणारे परिणाम यावर प्रतिबंध लावता येईल.




मा.आयुक्त यांचे आदेशानुसार पशुसंवर्धन विभाग, बाजार परवाना विभाग व अतिक्रमण विभाग यांचे मार्फत दुपारी १२.०० वाजता संयुक्त कार्यवाही करण्यास सुरुवात करण्यात आली. सदर कार्यवाही करीता संवेदनशील भाग असल्याने शेकडो नागरिकांच्या विरोधाला न झुमानता बडनेरा पोलिस स्टेशन यांची मदत घेवून सोमवार बाजार येथील १५ दुकाने तोडण्यात आली व ५ दुकाने सिल करण्यात आले. या दुकानांमध्ये महानगरपालिका बाजार परवाना विभाग यांचे मार्फत कुठलेही परवाने नसल्याचे आढळून आले. तसेच सदर दुकाने अतिक्रमीत जागेवर आढळून आली. त्यामुळे तात्काळ दुकानांच्या मालकांना महानगरपालिका अधिनियम कलम २३१, २३२, ३३६ अन्वये कार्यवाही केली तसेच काही ५ दुकाने सिल करण्यात आले.

सदर कार्यवाही करीता पशुवैद्यकीय डॉ.सचिन बोंन्द्रे, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकार, अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, राहुल वैद्य, बाजार परवाना विभागाचे उदय चव्हाण, अजय बन्सेले उपस्थित होते.

# श्री चक्रधर स्वामीचा अवतार दिन शासकीय कार्यालयात साजरा होणार

## निर्णयाबाबत राज्य सरकारचे अभिनंदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती,** महाराष्ट्र सरकारने भाद्रपद शुध्द द्वितीया या तिथीला सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामीचा अवतार दिन सर्व शासकीय कार्यालयातून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या शासकीय निर्णयाचे सरकारचे सर्व महानुभाव अनुयायी साधक व संपूर्ण महानुभाव पंथाचे तेराही ज्ञानपिठाधीशांकडून अभिनंदन होत आहे.

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी सत्य, अहिंसा, शांती व समतेचा विचार संपूर्ण महाराष्ट्रभर परिभ्रमण करून बाराव्या शतकात समाजाला दिला. तोच विचार महानुभाव पंथाच्या संत महंत तपस्विनी वासनिक भक्त अनयायांनी समाजापर्यत पोहचविण्याचा प्रयत्न केला



तोच विचार धरून महाराष्ट्रशासनाने सत्य, अहिंसा, शांती, समता हा सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचा विचार तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामीच्या अवतार दिनाचे औचित्यसाधून सर्व शाळा, कॉलेज-महाविद्यालयव शासकीय कार्यालये या माध्यमाव्दारे साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री व सर्व शासकीय अधिकाऱ्यांचे महानुभाव पंथीय अनुयायांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने काढलेल्या अध्यादेशाला परीपूर्ण समर्थन करीत असल्याचे प.पु.प.म.श्री कवीश्वर कुळाचार्य कारंजेकर बाबा, नियोजित अध्यक्ष अखिल भारतीय महानुभाव परिषद यांनी सांगितले.

# विश्व संवाद केंद्र पत्रकार सन्मान सोहळा

## जबाबदारीची पत्रकारिता काळाची गरज

### माहिती आयुक्त गजानन निमदेव यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–**

आजच्या काळात पत्रकारला स्वतःच्या मनाने काम करता येत नाही. जे व्यवस्थापनाचे धोरण आहे, तेच मांडावे लागते. आपल्या लिखाणाने कोणाची बदनामी होणार नाही, याची काळजी घ्यायलाच हवी. आरोपांच्या बातम्या प्रकाशित करताना दोन्ही बाजूंचा समावेश असावा. जबादारीची पत्रकारिता ही काळाची गरज असून तिन्ही पुरस्कार प्राप्त पत्रकारांची निवड योग्य असल्याचे प्रतिपादन नागपूर खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त गजानन निमदेव यांनी केले.विश्व संवाद केंद्र, अमरावतीद्वारे आद्य पत्रकार देवर्षी नारद जयंतीनिमित्त अमरावती विभाग पत्रकारिता सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी सायंकाळी श्री हव्याप्र



मंडळाच्या सभागृहात करण्यात आले होते. त्यावेळी ते प्रमुख वक्ता म्हणून बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून कॉलेज ऑफ ॲनिमेशन बायोइंजिनियरींग ॲन्ड रिसर्च सेंटरचे संस्थापक संचालक विजय राऊत उपस्थित होते. याशिवाय मंचावर रा. स्व. संघाचे महानगर संघचालक उल्हास बपोरीकर, विदर्भ प्रांत प्रचार प्रमुख संदीप गुळवे उपस्थित होते. खा. अनिल बोंडे यांची कार्यक्रमाला विशेषत्वाने उपस्थिती होती.

छत्रसाल विकास मंडळाचे अध्यक्ष गोपाल गुप्ता पुरस्कृत उत्तम लेखन व पत्रकारितेसाठी दै. हिंदुस्थानचे उपसंपादक निशिकांत राजबिंडे, स्व. त्रिवेणीताई सुखदेवराव बोंडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्रिवेणी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या विश्वस्त डॉ. वसुधा अनिल बोंडे पुरस्कृत ग्रामीण भागातून तत्परतेने वृत्त संकलनासाठी दै. पुण्यनगरीचे धामणगाव रेल्वे तालुका प्रतिनिधी चेतन पसारी, स्व. रमेशचंद्र शिंदे यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. चंद्रकांत शिंदे पुरस्कृत डिजीटल माध्यमात नेटाने परिश्रमपूर्वक कार्य करणारे समाचार दर्शनचे जेष्ठ पत्रकार यशवंत उर्फ अशोक जोशी यांना देवर्षी नारद पुरस्कार देऊन मान्यवरांच्याहस्ते सन्मानीत करण्यात आले. पुरस्कार पुरस्कृत करणारे यावेळी आवर्जून उपस्थित होते. शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, ११ हजार रोख असे पुरस्काराचे स्वरूप होते. विजय राऊत म्हणाले, पत्रकारिता हे समाजाचा खरा चेहरा दाखवणारे क्षेत्र आहे. त्यामुळे मी सुद्धा चित्रकार असूनही पत्रकारिता करतो. कारण चित्रांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचण्याचा माझा प्रयत्न असतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केदार गोगरकर, सूत्रसंचालन अमरावती विभाग प्रचार प्रमुख सौरभ लांडगे, आभार अमरावती महानगर प्रचार प्रमुख राहुल गुल्हाने यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता शिवानी भेंडारकर यांनी सादर केलेल्या पसायदानाने झाली. कार्यक्रमाला प्रचार विभागाचे सर्व सदस्य व विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

# नितीन गडकरींनी सरन्यायाधीश गवईंना दिला 'आदेश', त्यांच्याकडून लगेच मान्यही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२नागपूर :–** न्या.भूषण गवई यांनी १४ मे रोजी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतली. मूळत: विदर्भातील रहिवासी असलेले न्या.गवई सरन्यायाधीशपदाची शपथ घेतल्यावर पहिल्यांदाच नागपूरमध्ये आले होते. मागील आठवड्यात सरन्यायाधीशांनी नागपूरमध्ये अनेक कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदविला. यापैकी दोन कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरीही सरन्यायाधीशांसोबत मंचावर उपस्थित होते.

सरन्यायाधीश गवई यांचा हायकोर्ट बार असोसिएशन तसेच नागपूर जिल्हा वकील संघटनेच्यवतीने सत्कार करण्यात आला. दरम्यान, सरन्यायाधीशांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी नागपूर विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या विधी महाविद्यालयातील संविधान प्रास्ताविका पार्कचे उद्घाटन झाले तसेच वारंगा येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या नव्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटनही सरन्यायाधीशांच्या हस्ते पार पडले.नागपूर विद्यापीठ आणि राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या मंचावर सरन्यायाधीश भूषण गवई आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी एकत्रित होते. नागपूर विद्यापीठाच्या कार्यक्रमात नितीन गडकरी यांनी सरन्यायाधीशांना आदेश दिला. याबाबत सरन्यायाधीशांनी स्वत: त्यांच्या भाषणातून माहिती दिली.

गडकरींनी काय आदेश दिला?

नागपूर विद्यापीठाच्या कार्यक्रमात सरन्यायाधीश तसेच गडकरी यांच्यासह मोठ्या संख्येत मान्यवर उपस्थित होते. यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही समावेश होता. याशिवाय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, नागपूर




खंडपीठाचे प्रशासकीय न्या.नितीन सांबरे, विधी व न्याय राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, संविधान प्रास्ताविका पार्क निर्माण समितीचे अध्यक्ष गिरीश गांधी, कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे, प्र-कुलगुरु डॉ. सुभाष कोंडावार, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, माजी कुलगुरू डॉ. सिद्धिविनायक काणे, समितीतील सदस्य सेवानिवृत्त न्यायमूर्ती किशोर रोही, आमदार डॉ. नितीन राऊत, आमदार मोहन मते यांच्यासह मोठ्या संख्येत मान्यवर मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रम नियोजित वेळेपेक्षा उशीरा सुरू झाला. यातही अनेक मान्यवरांनी लांबलचक भाषण केले. सरन्यायाधीश यांचे भाषण सर्वात शेवटी ठेवण्यात आले होते. सरन्यायाधीश यांनी भाषणादरम्यान सांगितले की त्यांनी वर्तमानपत्रात वाचले आहे की नितीन गडकरी यांचा १२ वाजता तर देवेंद्र फडणवीस यांचा १२.१५ वाजता एक दुसरा कार्यक्रम आहे.

# कष्टाच्या वारीतून साकारलं जीवन – कंधारे

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२पुणे,** कष्ट आणि झपाट्यानं काम करणं या दोनच गोष्टी माझ्याकडे होत्या. तेच माझं भांडवल होतं. कष्टाच्या वारीतूनच मी इथपर्यंत पोहोचले आहे, असं मत घरकाम मदतनीस नंदा कंधारे यांनी व्यक्त केलं. सारद मजकूरच्या वतीने मुळातून माणूस हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. एस. एम. जोशी सभागृहाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमात यावेळी थ्री इडियट फ्रेम प्रयोगशील शिक्षणकर्मी सोनम वांगचुक यांच्या संस्थेशी जोडल्या गेलेल्या पद्मा लामो, सामाजिक कार्यकर्ते संदीप बर्वे, प्रा.



नीलम पंडित, लेखक प्रतीक पुरी, सुमित डेंगळे, सारद मजकूरचे अभिजित सोनावणे, अमृता देसर्डा, तेजस्विनी गांधी, प्रसन्न कुलकर्णी आदी उपस्थित होते.कंधारे म्हणाल्या, 'दरवर्षी वारीच्या काळात जमेल तितकं वारीबरोबच चालणं माझं चुकलं नाही. या काळात पंढरपूरच्या पांडुरंगाचं दर्शनही चुकलं नाही. तसंच आजवरच्या आयुष्यात कष्ट करणं मी कधी सोडलं नाही. लहानपण शेताच्या कामातच गेलं. कष्टाची सवय तिथंच लागली. काहीही झालं तरी कष्ट करायला लाजायचं नाही, हा गुण वडलांमुळं माझ्यात आला. लग्न झाल्यावर घरकाम करण्याचा पर्याय स्वीकारावा लागला. पण त्यातूनच माझ्या मुलांचं मी शिक्षण करू शकले. कष्ट करणं हीच माझ्यासाठी सगळ्यात आवडीची गोष्ट आहे.''कंधारे यांच्याबद्दल काही मंडळींनीही भावना व्यक्त केल्या. 'नंदा मावशी कामाच्या बाबतीत वाघ आहे. कामाच्या बाबतीत त्या कायमच उत्साही असतात. नकारात्मक प्रतिक्रिया देणं हे त्यांच्या स्वभावात मी कधीच पाहिलं नाही', असं भक्ती खांडेकर म्हणाल्या. 'आपल्याकडे जे जे चांगलं आहे, ते वारकरी संप्रदायातून आलं आहे. कंधारे यांच्या कष्टाचा धागा वारीतून आला आहे,'

असं मला वाटतं असं मत संदीप बर्वे यांनी व्यक्त केलं. 'नंदा मावशींच्या जेवणाला आपुलकीची चव आहे. त्यांच्यासारख्या घरकाम करणाऱ्या माणसांच्या कष्टांना आपण कायमच गृहीत धरतो. पण त्यांचंही कौतुक होणं गरजेचं आहे, असं प्रतीक पुरी यांनी सांगितलं. प्रास्ताविक अभिजित सोनावणे यांनी केलं. यावेळी तेजस्विनी गांधी, सुमित डेंगळे, सुषमा कंधारे, प्रा. नीलम पंडित यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.



# सितारा कॉलनीत अवैध गॅस रिफिलिंगचा पर्दाफाश

## आरोपी अटकेत, २२ हजारांचा मुद्देमाल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीतील सितारा कॉलनी ले-आउट येथे घरगुती भारत गॅस सिलेंडरमधून वाहनात गॅस रिफिलिंग करणाऱ्या अवैध धंद्यावर गुन्हे शाखा युनिट क्र. ०१ आणि गाडगेनगर पोलीसांनी संयुक्त कारवाई केली. या कारवाईत एक आरोपी अटकेत असून, २२,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आज १ जुलै रोजी छापा टाकला. या कारवाईदरम्यान आरोपी शहजाद परवेज अब्दुल जहीर (वय ३७, रा. सुफीयान नगर, वलगाव रोड) हा इलेक्ट्रिक मोटरच्या सहाय्याने घरगुती सिलेंडरमधून गॅस रिफिल करताना आढळून आला. घटनास्थळावरून ३ भरलेले, ८ रिकामे व १ अर्धवट भरलेला सिलेंडर, एक इलेक्ट्रिक मोटर, प्रो युनायटेड कंपनीचा वजन काटा असा एकूण २२,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपआयुक्त कल्पना बारवकर, पोलीस उपआयुक्त सागर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोनि. गोरखनाथ जाधव व गुन्हे शाखा युनिट क्र. ०१ च्या पथकाने केली. पुढील तपास गाडगेनगर पोलीस करीत आहेत.

# चोरीच्या दुचाकीवर फिरणाऱ्या नागपुरच्या २ चोरट्यांना शिताफीने अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती,**

एलसीबीच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे मोर्शी शहरात विना क्रमांकाच्या दुचाकीवर संशयीतरित्या फिरणाऱ्या दोन आरोपींना अटक केली. दोन्ही चोरटे नागपुरनजीकच्या सिल्लोरी भागातील रहिवासी असून त्यांनी अमरावती ग्रामीणमधील मोर्शी व तिवसा पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन घरफोडींची कबूली दिली. तसेच नागपुर शहरातील मानकापुर व गिट्टी खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीतून ३ दुचाकी चोरल्याची कबूली देखील पोलिसांना दिली.

अक्षय शंकर बागडे (३०), बॉबी गणेश गोरखेडे (२७) दोन्ही रा. सिल्लोरी, नागपुर अशी अट-केतील आरोपींची नावे आहेत. माहितीनुसार, मोर्शी शहरात दोन संशयीत युवक विना क्रमांकाच्या दुचाकीवर फिरत असल्याची गोपनीय माहिती एलसीबीचे प्रमुख पीआय किरण वानखडे यांना मिळाली. त्यानुसार पीआय किरण वानखडे यांनी त्यांच्या पथकातील एपीआय सचिन पवार, हेड कॉस्टेबल युवराज मानमोठे, रविंद्र वऱ्हाडे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने चालक निलेश आवंडकर यांच्यासह मिळून तात्काळ मोर्शी शहर गाठून वरील नमूद दोन्ही आरोपींना अटक केली. पोलिसांनी आरोपींचा रेकार्ड तपासला असता ते नागपुर शहर पोलिसांच्या रेकार्डवरील अट्टल चोर असल्याचे दिसले. त्यानुसार पोलिसांनी मोर्शी का फिरत आहे, याबाबत आरोपींची कसून चौकशी केली असता त्यांनी अमरावती ग्रामीणमधील मोर्शी व तिवसा पोलिस ठाण्यात दोन घरफोडींची कबूलीदिली. तसेचनागपुर शहरातील मानकापुर पोलिसठाण्याच्याहद्दीतून एमएच-४९-बीएफ-९२६९ क्रमांकाची दुचारी, गिट्टी खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीतून एमएच-१९-बीवाय-४६१५ व एमएच-३१-ईएच--३४५८ क्रमांकाच्या दोनदुचाकींची चोरी केल्याची कबूली पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी दोन्ही आरोपींच्या ताब्यातून नगदी २ हजार ६१० रूपये, त्यांनी चोरलेल्या नागपुर शहरातील ३ दुचाकी असाएकूण १ लाख ४२ हजार ६१० रूपयांचा ऐवज जप्त केला. दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी मोर्शी पोलिसांच्या स्वाधीन केले. मोर्शी पोलिसांचा तपास झाल्यानंतर तिवसा व नागपुर शहरातील मानकापुर, गिट्टी खदान पोलिस आरोपींना त्यांच्या गुन्ह्यातील तपासासाठी न्यायालयाच्या परवानगीने अटक करणार आहेत.

# काही पुरावे असतील तर सादर करा, राऊतांच्या आरोपांवर आमदार सुनील शेळकेंचं थेट चॅलेंज



**विदर्भ प्रजासत्ताक दि.मुंबई**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र पाठवले आहे. या पत्राद्वारे त्यांनी अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळकेंवर गंभीर आरोप केले आहेत. सुनील शेळकेंनी उत्खनन क्षेत्रातील हजारो कोटींची रॉयल्टी बुडवून सरकारची फसवणूक केल्याचा आरोप राऊतांनी केला. तसेच शेळकेंवर कारवाई करून महाराष्ट्राची लूट थांबवावी अशी मागणी राऊतांनी केली. या आरोपांवर आता सुनील शेळकेंनी भाष्य केलं. संजय राऊतांनी यासंबंधीचे पुरावे दिले तर मी त्यावर खुलासा करेन, असं ते म्हणाले.

# अमरावती विद्यापीठाच्या पीएचडी कोर्स वर्क परीक्षेची तयारी पूर्ण

## १३ जुलैला परीक्षा, प्रत्येक जिल्ह्यात एक परीक्षा केंद्र नियुक्त




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आचार्य पदवी कोर्स वर्क परीक्षा १३ जुलै रोजी होणार आहे. ही परीक्षा सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत घेण्यात येईल. विद्यापीठाने प्रत्येक जिल्ह्यात एक परीक्षा केंद्र नियुक्त केले आहे.

अमरावतीत विद्याभारती महाविद्यालयात परीक्षा होईल. अकोल्यात सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात परीक्षा घेतली जाईल. बुलडाणा जिल्ह्यातील खामगावमधील जी.एस. विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय हे परीक्षा केंद्र असेल. यवतमाळमध्ये अमोलकचंद महाविद्यालय आणि राजस्थान आर्यन कला मिठूलालजी कचोलिया वाणिज्य महाविद्यालयात परीक्षा होईल. वाशिम येथे सत्यनारायणजी रामकृष्णजी राठी विज्ञान महाविद्यालयात परीक्षा घेतली जाईल.

परीक्षेचे प्रवेशपत्र संशोधन केंद्राच्या लॉगीन आयडीमध्ये ५ जुलैपर्यंत उपलब्ध होतील. परीक्षेच्या एक तास आधी प्युस सॉफ्टवेअरमधून प्रश्नपत्रिका ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या जातील. परीक्षा केंद्राधिकारी आणि सहकेंद्राधिकारी यांना प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्सची जबाबदारी दिली आहे.

विद्यार्थ्यांचे गुण १४ ते २१ जुलैदरम्यान संशोधन केंद्राच्या लॉगीन आयडीमध्ये भरावे लागतील. ऑफलाईन गुण स्वीकारले जाणार नाहीत. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी सर्व संबंधितांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी आचार्य कक्षाच्या उपकुलसचिव मिनल मालधुरे यांच्याशी संपर्क साधता येईल.

# दर्यापूरमध्ये राज्य शिक्षक संघाची सभा संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२दर्यापूर**

दर्यापूर येथे राज्य शिक्षक संघाच्या सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेला राज्य शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष मा.श्री.दिलीपराव कडू, सरचिटणीस मा.श्री.भोजराजजी काळे , विभागीय संघटक मा.श्री ललितजी चौधरी, अमरावती जिल्हाध्यक्ष मा.श्री अनिलभाऊ भारसाकळे, समन्वय श्री. गजाननरावराव मानकर, अमरावती ग्रामीण कार्याध्यक्ष मा.श्री रविंद्रजी हगवणे, अमरावती जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ अध्यक्ष मा.श्रीकांतजी कडू, राज्य शिक्षक संघ सदस्य मा.श्री रविंद्रजी उमक, सदस्य राज्य शिक्षक संघ मा.राजिक पठाण यांच्या प्रामुख्याने प्रमुख उपस्थितीत दर्यापूर तालुका राज्य शिक्षक संघाच्या सभेचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीला डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.तालुका कार्यकारिणी च्या वतीने मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर राज्य शिक्षक संघ दर्यापूर तालुका कार्यकारणी यांच्याकडून,प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गणित अध्यापक मंडळ अमरावती ग्रामीण अध्यक्षपदी नवनियुक्त झालेले मा.श्री. प्रमोद घरडे यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर भाषा अध्यापक मंडळ अध्यक्ष म्हणून नवनियुक्त झालेले मा.श्री.श्रीकांतजी लाजुरकर यांचे सुद्धा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर मा.श्री अनिलराव भारसाकळे यांनी आपल्या प्रास्ताविकतेमधून जुलै मध्ये होऊ घातलेल्या राज्य शिक्षक संघाच्या अधिवेशनाच्या संदर्भात पार्श्वभूमी, नियोजन रूपरेषा स्पष्ट केले. त्यानंतर मा.श्री.श्रीकांतजी लाजुरकर, मा.श्री.गजाननराव मानकर समन्वय, मुख्याध्यापक दर्यापूर तालुका अध्यक्ष मा.श्री केशवरावजी भडांगे, राज्य शिक्षक संघ चिटणीस मा.श्री भोजराजजी काळे, राज्याध्यक्ष मा.श्री दिलीपराव कडू यांचे मार्गदर्शनपर मनोगत झाले.त्यानंतर राज्य शिक्षक संघाचे प्रथम अधिवेशन दर्यापूर मध्ये आयोजित करण्यावर सभेमध्ये चर्चा झाली. आणि २० जुलैला राज्यशिक्षक संघाच्या अधिवेशनाची तारीख निश्चित करण्यात आली. या सभेमध्ये अधिवेशन व नियोजनावर चर्चा झाली. या प्रसंगी तालुका अध्यक्ष राजेश पुरी सचिव विजय इंगळे प्रविण वडतकर, सचिन गिरी,अनंत ठाकरे ,शैलेश ठाकरे, संतोष राठोड,रिजवान खान, शिष राणा ऊपेंद्रकुमार राणे ,वासुदेव भांडे ,सुनिल चारथळ ,गजानन घटाळे ,गोपाल वडतकर अनिल तायडे उपस्थित होते सभेचे सूत्रसंचालन श्री.जी.ए.घटाळे तर आभार प्रदर्शन तालुका अध्यक्ष आर. डी.पुरी यांनी केले.

# वर्धा नदीवरील अवैध रेती उत्खननावर कठोर कारवाई : महसूलमंत्र्यांचे परिषदेत आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२मुंबई**

वर्धा नदीच्या किनाऱ्यावर होत असलेल्या अवैध रेती उत्खनन प्रकरणात कठोर कारवाई होईल. तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आ. दादाराव केचे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला सविस्तर उत्तर देताना ते बोलत होते.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यात अवैध रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी सरकारने नवीन वाळू धोरण लागू केले आहे. या धोरणांतर्गत १ एप्रिल २०२५ रोजी डेपो धोरण रद्द करून नवीन वाळू धोरण जाहीर करण्यात आले. यामुळे चंद्रपूर येथील पहिल्या रेतीघाटाच्या लिलावातून शासनाला १०० कोटी रुपये महसूल मिळाला. तसेच, छोट्या-छोट्या रेतीघाटांचे लिलाव करून महसूल वाढवण्याचा आणि अवैध उत्खननावर नियंत्रण ठेवण्याचा सरकारचा मानस आहे.



श्री.बावनकुळे यांनी सांगितले की, ३० एप्रिल २०२५ रोजी जाहीर केलेल्या धोरणानुसार, घरकुल योजनेसाठी ५ ब्रास रेती तहसीलदारांमार्फत मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी ऑनलाइन पोर्टलवर पास जनरेट केले जाणार असून, स्थानिक ग्रामपंचायत आणि नगरपंचायतींना बांधकामासाठी रॉयल्टीच्या आधारावर रेती उपलब्ध करून दिली जाईल. तसेच, खाजगी बांधकामांसाठीही तहसीलदारांना नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे.

आ. दादाराव केचे यांनी स्थानिक तलाठी आणि महसूल अधिकाऱ्यांच्या सहभागामुळे कारवाई होत नसल्याबाबत प्रश्न उपस्थित केला. यावर मंत्र्यांनी सबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले. याशिवाय, ड्रोनद्वारे रेतीघाटांचे सर्वेक्षण आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आ. शशिकांत शिंदे यांनी याप्रकरणी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली होती. यावर मंत्र्यांनी, मुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार, महसूल आणि पोलीस खात्याने संयुक्त कारवाई करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले असल्याचे सांगितले.

महसूलमंत्र्यांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेत याठिकाणी संबंधित अधिकाऱ्याना निलंबित करण्याचे आश्वासन दिले आहे.यामुळे अवैध रेती उत्खननाला आळा बसणार असून, स्थानिक बांधकामांना रेती उपलब्ध करून देण्याचे धोरण प्रभावीपणे राबवले जाणार आहे, असे त्यांनी विधानसभेत सांगितले.

महसूल राज्यमंत्र्यांनी वाळू चोरली असा आरोप आ. अनिल परब यांनी केला, त्यावर उत्तर देताना महसूल मंत्री म्हणाले, आ. परब यांनी मला अधिकची माहिती दिली तर मी अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहात निवेदन करेन.

**अवैध रेती उत्खनन रोखण्यासाठी एम सँण्ड धोरण**

अवैध रेती उत्खननावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने क्रशर धोरण आणले असून, प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्सना परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नैसर्गिक रेतीवरील अवलंबित्व ९० टक्क्यांनी कमी होईल, असे मंत्र्यांनी सांगितले. तसेच, अवैध रेती वाहतुकीवर आळा घालण्यासाठी परिवहन खात्यामार्फत वाहन निलंबनाची कारवाई केली जाणार आहे. पहिल्या गुन्ह्यासाठी १५ दिवस, दुसऱ्या गुन्ह्यासाठी एक महिना आणि तिसऱ्या गुन्ह्यासाठी कायमस्वरूपी वाहन निलंबनाचा प्रस्ताव आहे.

# १४ महिला शेतकरी ठरल्या कर्तबगार: कृषिदिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत अमरावतीत केला सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

जिल्ह्यातील १४ महिला शेतकऱ्यांवर जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने कर्तबगार महिला असे शिक्कामोर्तब केले आहे. सीईओ संजीता महापात्र यांच्या अध्यक्षतेखाली आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मंगळवार, १ जुलै कृषिदिनी या महिलांचा सत्कार करण्यात आला.



जि. प.च्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात हा सत्कार सोहळा घेण्यात आला. या वेळी डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, डेप्युटी सीईओ बाळासाहेब बायस, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. राहुल सातपुते, 'आत्मा'च्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, कृषी विकास अधिकारी मल्ला तोडकर, रजनी रावणकर, चिखलदऱ्यातील शांता साठे, चांदूर रेल्वेतील सविता डोंगरे, अंजनगाव सुर्जी तील रेखा पिसाट, धामणगाव रेल्वेतील मोनिका दगडकर, अमरावती तालुक्यातील शीतल शिंदे, तिवस्यातील जयश्री खवले, अचलपूर तालुक्यातील मंदा मेहरे, भातकुलीतील रेखा शेंद्रे, नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माधुरी काकडे, दर्यापुरातील जयश्री टोळे, धारणीतील रामगोपाल मावस्कर, मोर्शी तालुक्यातील लता पोहेकर आणि वरुड तालुक्यातील माया यावलकर यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी कृषी विभागाचे आभार मानले.

# 'केसरी-२' मधील सर सीएस नायर यांचे अमरावतीशी नाते काय? अक्षय कुमारने साकारली भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

अक्षय कुमारने मोठ्या पडद्यावर अनेक प्रसिद्ध भारतीय पात्रे साकारली आहेत, ज्यात सम्राट पृथ्वीराज चौहानपासून ते पॅडमॅनमध्ये अरुणाचलम मुरुगनाथम यांचा समावेश आहे. 'केसरी-२' मध्ये अक्षय कुमारने एका कर्तबगार वकिलाची भूमिका साकारली आहे. हा चित्रपट सध्या 'ओटीटी'वर चांगलाच गाजत आहे. अक्षय कुमारने साकारलेले पात्र हे ब्रिटिश काळातील प्रसिद्ध वकील सर चेत्तूर शंकरन नायर यांचे आहे. त्यांचे महाराष्ट्रातील अमरावतीशी विशेष नाते आहे.

सर चेत्तूर शंकरन नायर यांचा जन्म मलबारच्या पल्लकड जिल्ह्यातील एका श्रीमंत कुटुंबात झाला. सीएस नायर हे एक सुप्रसिद्ध भारतीय वकील तसेच राष्ट्रवादी राजकारणी होते. ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सुरुवातीच्या काळातले सर्वात तरुण अध्यक्ष बनले. १९१२ मध्ये, त्यांना ब्रिटिश राजघराण्याने नाइटची पदवी दिली. जालियनवाला बाग हत्याकांडाच्या वेळी, सीएस नायर हे शिक्षण मंत्री आणि व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेतील एकमेव भारतीय प्रतिनिधी म्हणून काम करत होते. जालियनवाला हत्याकांडानंतर, रवींद्रनाथ टागोर यांनी निषेध म्हणून त्यांचा नाईटहूड पदवीचा त्याग केला होता. त्याचप्रमाणे, सीएस नायर यांनी ब्रिटिश



सरकारच्या कृतींवर आपले मत व्यक्त केले आणि निषेध म्हणून आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.डिसेंबर १८९७ मध्ये अमरावतीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. सी. शंकरन नायर हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते, तर दादासाहेब खापर्डे हे स्वागताध्यक्ष होते.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भरलेल्या या अधिवेशनात सी. शंकरन नायर यांचे प्रभावी अध्यक्षीय भाषण झाले. ब्रिटिश शासनकाळात देशातील दारिद्र्य बेसुमार वाढत असल्याची भावना सुशिक्षितात बळावत असल्याचे ते म्हणाले होते. पुण्यातील दडपशाहीचा उल्लेख करून तत्कालीन मुद्रण निर्बंध आणि नातूबंधूची अटक यामुळे सरकार नागरिकांच्या मुलभूत हक्कांची पायमल्ली करीत आहे, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले होते. तसेच टिळकांवरील खटल्याच्या वेळी ज्युरीपैकी निम्मे सदस्य भारतीय असते, तर टिळक निर्दोष सुटले असते, असे विधान करण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही, असा उल्लेख 'महाराष्ट्रातील काँग्रेसचा लढा' या ग्रंथात आहे.

अमरावतीला झालेल्या काँग्रेस अधिवेशनापासून अमरावतीच्या महिलांनी राजकीय चळवळीत भाग घेण्याचा शुभारंभ झाला. यावेळी पुरूषांच्या विरोधाला न जुमानता वनिता समाजतर्फे स्त्रियांच्या कलाकुसरीचे व स्वदेशी वस्तूंचे एक प्रदर्शन अधिवेशनाच्या मंडपाला लागूनच भरले होते. याच अधिवेशनातून जहाल विचारसरणीला अधिक धार आली, असे मानले जाते.

# पावले चालती पंढरीची वाट......




पंढरीच्या विठ्ठलदर्शनाची आस लागलेल्या भाविकांसाठी आज नया अमरावती रेल्वेस्थानकावरून पहिली पंढरपूर विशेष रेल्वे रवाना झाली या रेल्वेला खासदरा बळवंत वानखडे यांनी हिरवी झेंडी दाखवीत रवाना केले.या वेळी खा.बळवंत वानखडे यांनी वारकऱ्यांसोबत संवाद साधत त्यांचे आशीर्वाद हि घेतले. यावेळी रेल्वे चालक , गार्ड यांचा सत्कार हि करण्यात आला.आषाढीसाठी विदर्भातून नागपूर, नवी अमरावती, अकोला आणि खामगाव येथून या रेल्वेगाड्या सुटणार आहेत.

# भाऊ... हॅप्पी बर्थ डे !!



अमरावती जिल्ह्याचे शांत संयमी संवेदशील खासदार म्हणून ओळख असलेले मा. बळवंतभाऊ वानखड़े यांच्या जन्मदिनी आज काँग्रेस भवन श्यामनगर येथे अभीष्टचिंतन करताना.युसीएन न्यूज चॅनलचे जिल्हाप्रतिनिधी अरुण जोशी,सा.दरारा लोकशाहीचे संपादक राज माहोरे,आर.एन.ओ. न्यूज एजन्सी चे सागर तायडे.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील घरकुल योजनेला वेग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील घरकुल योजनेला चांगलाच वेग आला आहे. वाळू वितरणाची प्रक्रिया वेगात सुरू झाल्याने घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, सामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांनी पालकमंत्री महोदयांचे आभार मानले आहेत.महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अमरावती जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना वाळू वितरणाची प्रक्रिया वेगात सुरू असून, ३० जून २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील ५४ हजार ९४९ मंजूर घरकुलांपैकी ७ हजार १४८ लाभार्थ्यांना वाळूचा पुरवठा करण्यात आला आहे.घरकुलांसाठी एकूण २ लक्ष १५ हजार १४ ब्रास वाळूची मागणी आहे. जिल्ह्यामध्ये स्थानिक वापरासाठी १६५ वाळू गट राखीव ठेवण्यात आले असून, त्यातून ५४ हजार ९१८ ब्रास वाळूसाठा उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, एकही वाळू गट अद्याप लिलावात गेलेला नाही, त्यामुळे हा संपूर्ण साठा घरकुल लाभार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. आतापर्यंत ८ हजार ८७० ब्रास वाळूचे वितरण करण्यात आले आहे.तालुकानिहाय वाळू वाटपाचा तपशील (लाभार्थी संख्या आणि वाटप झालेली वाळू ब्रासमध्ये) अमरावती-१५ लाभार्थी, ७५ ब्रास, तिवसा- ३१, लाभार्थी, १२१ ब्रास, भातकुली- २७९ लाभार्थी, २८७ ब्रास, चांदूर रेल्वे- २४५ लाभार्थी, ३०७ ब्रास, नांदगाव खंडेश्वर- ३९९ लाभार्थी, ४३० ब्रास, धामणगाव रेल्वे- २०३ लाभार्थी, २३६ ब्रास, मोर्शी- ४३४ लाभार्थी, ४३४ ब्रास, वरुड- ४७९ लाभार्थी, ४९० ब्रास, दर्यापूर-२६५ लाभार्थी, ६२८ ब्रास, अंजनगावसुर्जी-३५० लाभार्थी, ३५० ब्रास, अचलपूर- २ हजार ७३१ लाभार्थी, २ हजार ९९१ ब्रास, चांदूरबाजार-२१७ लाभार्थी, १ हजार २१ ब्रास, धारणी- १ हजार ५०० लाभार्थी, १ हजार ५०० ब्रास, चिखलदरा-० लाभार्थी, ० ब्रास.

## तामसवाडी फाटा, दर्यापूर-अंजनगाव मार्गावर भीषण अपघात; १० प्रवासी जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ दर्यापूर**

दर्यापूर ते अंजनगाव मार्गावरील तामसवाडी फाटा जवळ बुधवार, २ जुलै रोजी दुपारी सुमारे एकच्या सुमारास ऑटो पलटी होऊन भीषण अपघात झाला. या घटनेत गोंडवाघोली (ता. अंजनगाव) येथील १० प्रवासी जखमी झाले असून त्यातील तीन प्रवाशांची प्रकृती चिंताजनक आहे.




प्राथमिक माहितीनुसार, दर्यापूर येथे शालेय कामासाठी निघालेल्या प्रवाशांचा ऑटो चालकाचे नियंत्रण सुटल्याने पलटी झाला. अपघातानंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांनी गर्दी केली. सर्व जखमींना तातडीने दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, डॉक्टर पंकज कोरडे यांच्या माहितीनुसार गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविण्यात येणार आहे.घटनास्थळी पोलीस तपास सुरू असून अपघातानंतर रुग्णालयातही नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

# अमरावती रेल्वे स्टेशन वरून शेकडो वारकरी पंढरपुराला रवाना

### तुषार भारतीय मित्र परिवार तर्फे रेनकोट, साबुदाणा खिचडी प्राथमिक औषध वाटप जेष्ठ वारकरी तसेच रेल्वे चालक, गार्ड सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या धर्म, संस्कृती आणि परंपरेचा शिखराध्याय! दरवर्षी महाराष्ट्र आणि आजूबाजूच्या परिसरातील लाखो वारकरी बंधू-भगिनी आपल्या विठूमाऊलीच्या दर्शनासाठी प्राण डोळ्यांत आणून, मैलोनमैल चालत पंढरपूर क्षेत्री पोहोचतात. या अनुपम भक्तीसोहळ्याचं वर्णन शब्दात करता येणं अशक्यच! म्हणूनच वारीचं वर्णन करताना असं म्हणतात की,दिंडया पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ।।''

संत नामदेवाच्या या अभंगानुसार लाखो वारकरी 'माझे जीवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।।'' हा भाव अंतरी ठेवून खांद्यावर पताका, मुखाने हरिनाम आणि टाळ-मुदुंगाच्या गजरात पंढरीत दाखल होण्यासाठी आज अमरावती रेल्वे स्टेशन वरून शेकडो वारकरी पंढरपुरला रवाना झाले .



महाराष्ट्राचे आराध्य दैवत पांडुरंग व रुख्मिणी यांच्या दर्शनाकरिता वारकरी भक्त आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर श्रीक्षेत्र पंढरपूरला जातात. वारकऱ्यांची सेवा करण्याच्या दृष्टीने दरवर्षी नगरसेवक तुषार भारतीय यांच्या पुढाकाराने वतीने साबुदाणा खिचडी , रेनकोट , प्राथमिक औषध वाटप तसेच जेष्ठ वारकरी व रेल्वे चालक , गार्ड सत्कार करण्यात आला .या आनंददायी व नेत्रदीपक सोहळाच साक्षीदार व्हाण्याकरिता माजी स्थायी सभापती श्री तुषार भारतीय यांच्या नेतृत्वाखाली माजी महापौर चेतन गावंडे , प्रशांत शेंगोकर , सौ सुनंदा खरड , ऋषी खात्री , गजू कोल्हे , राजेश जगताप , मंदार नानोटी , बंडू विघे , गजानन लेंडे , शुभम वैष्णव , भूषण हरकूट , निलेश देशमुख , आकाश वाघमारे , हरिष साऊरकर , आदित्य कर्डीकर , कवल पांडे , संतोष पिंडेकर , हेमंत मालवीय , सुधीर पावडे , प्रफुल्ल गांधी , विवेक पांडे , श्रीलेश खांडेकर , अनिल पुराणिक , शंकरराव मुंधळे , गौतम देशपांडे , योगेश उघडे , अशोक गाडे , रामराव देशमुख ,अनिल नंदनवार , गोपाळ दलाल , रमेश मोहळे, बाळासाहेब पाटील, सुनील चौकडे, अनंत गावंडे , प्रसाद पहुरकर सम्राट खोब्रागडे अनिल अडसड, उज्वल मडसने , श्रीधर देशमुख , प्रदीप भागवत , वानखडे साहेब ,दिपील अकोलकर , प्रवीण देसली , के टी गावंडे , रावसाहेब देशमुख सह अनेक प्रतिष्ठित नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते

# भाजपा पदाधिकाऱ्यांना अ.प.गटाचे माजी आमदार देवेंद्र भुयार कडून जिवे मारण्याची धमकी

### ठाणेदारांना भाजपा पदाधिकाऱ्यांचे निवेदन, दोन्ही पदाधिकाऱ्यांनी केली तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ मोर्शी**

वरूड मोर्शीचे आ.चंदु उर्फ उमेश यावलकर यांची रविवार २९ जुन रोजी प्रत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेनंतर भाजपाच्या काही पदाधिकाऱ्यानी उपस्थित पत्रकारांसमोर आपली भुमिका स्पष्ट केली व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आ.यावलकर यांच्यावर केलेल्या आरोपाचे खंडण केले. त्याचा राग मनी बाळगून सैरावैरा झालेल्या माजी आमदाराने भाजपा तालुकाध्यक्ष राजकुमार राऊत रा.उदापुर व भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर सोलव रा.गव्हाणकुंड या दोन्ही पदाधिकाऱ्यांना व्हॉट्सप पवर व्हॉईस कॉलवर शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.



याप्रकरणी या दोन्ही भाजपा पदाधिकाऱ्यांनी १ जुलै रोजी पोलिसात तक्रार दाखल केली आहे.सदर तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, पत्रकार परिषदेत आम्ही आमची भुमीका मांडली व राकॉ अजित पवार गटाचे कार्यकर्त्यांनी केलेल्या आरोपांचे खंडण केले. त्याच दिवशी संध्याकाळी १० ते १२ च्या दरम्यान ३ वेळा भाजपा तालुकाध्यक्ष राजकुमार राऊत यांच्या भ्रमणध्वनीवर ९३७०६४१२२३ या नंबरवरून व्हॉट्सप व्हाईस कॉल आले, पण त्यांनी त्याला त्यावेळी प्रतीसाद दिला नाही. त्यानंतर ३० जुन रोजी सकाळी ९.३० वाजता त्याच नंबरवरून राऊत यांना पुन्हा व्हाट्सप व्हाईस



कॉल आला. त्यांनी प्रतीसाद दिला असता समोरील व्यक्तीने त्यांना म्हटले की, या नंतर माझ्या विरुध्द कुठेही बोलायचे नाही कींवा चर्चा करायची नाही, ही तुला लास्ट इंटिमेशन देतो, जर माझ्या विरोधात तु काही बोलला, तर तुला जिवंत ठेवनार नाही, तुझी लायकी नाही बोलायची मी अनेक पक्षाचे कार्यकर्ते बरबाद केले, तुला पण बरबाद करुन टाकेल असे म्हणून शिवीगाळ केली व मला जिवे मारण्याची धमकी दिली. तर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर सोलव यांच्या तक्रारीत नमुद केले की, माझ्या भ्रमणध्वनीवर सुद्धा ३० जुन रोजी ९३७०६४१२२३ नंबरवरून सायंकाळी व्हॉट्सप व्हाईस कॉल आला त्याने म्हटले की, तुम्ही माझ्याविरुद्ध बाईट दिली, मला शिविगाळ केली, आता तुमचे घराबाहेर निघणे मुश्किल करतो. असे म्हणुन मला जिवे मारण्याची धमकी दिली. ज्या नंबरवरून राऊत आणि सोलव यांना कॉल आला तो भ्रमणध्वनी क्रमांक माजी आमदार देवेंद्र भुयार यांचा असल्याने अशा गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीवर अंकुश घालून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन आम्हाला न्याय मिळावा या करीता तक्रार दाखल करीत आहे.

## पंढरपूरात रंगला राज्यभरातील पाच हजार सायकलपटूंचा 'रिंगण सोहळा', अमरावतीच्या ३८ सायकलपटूंचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

आरोग्य बळकट राहण्यासाठी नियमित सायकल चालवणाऱ्या ३८ सायकलपटूंनी खास आषाढी एकादशी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अमरावती ते पंढरपूर हे अंतर चार दिवसात गाठलं आहे. विशेष म्हणजे सायकल चालवा आणि पर्यावरण वाचवा असा संदेश देत राज्यभरातील एकूण ५ हजार सायकलपटू २१ जूनला पंढरपूरला एकत्र आले. त्यातून सायकलस्वारांचा अनोखा रिंगण सोहळा पंढरपुरात रंगला.

रोज पहाटे पाच वाजल्यापासून अमरावती सायकल असोसिएशनचे सदस्य सायकलवर स्वार होऊन २० किलोमीटर तर कधी २५ तर अनेकदा ५० ते ६० किलोमीटर पर्यंत सायकल चावतात. पन्नास ते साठ सायकलपटू असणाऱ्या या संघटनेत सहा ते सात महिला सायकलपटू आहेत. यापैकी वर्ष सदर, शालिनी महाजन, दिव्या मेश्राम, जयमाला देशमुख आणि शालिनी सेवानी या पाच महिला सायकलपटू अमरावती ते पंढरपूर अशा सायकल प्रवासात सहभागी



होत्या. आमच्या घरच्यांनी दिलेला पाठिंबा आणि अमरावती सायकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी आणि सचिव अतुल कळमकर यांनी निर्माण केलेल्या विश्वासामुळं आम्ही पंढरपूरची वारी सायकलद्वारे करू शकलो, असं या महिला सायकलपटू सांगतात.

१८ जूनला श्री अंबादेवी आणि श्री एकविरा देवीचं दर्शन घेऊन ३८ सायकलपटू पंढरपूरच्या दिशेनं रवाना झाले. पहिला मुक्काम वाशिम जिल्ह्यात कामारगाव येथे झाला. यानंतर पुढे वाशीम येथून प्रवास पुढे सुरू झाला. वादळ, पाऊस असतानाही सायकल चावताना 'जय हरी विठ्ठला'च्या नादात सायकल चालवताना कुठलाही ताण जाणवला नाही, असं वर्ष सदार म्हणल्या. प्रवासात जाण्याकरिता रस्ते अतिशय खराब होते. मात्र, पुरुष सायकलपटूंची मदत आणि आत्मविश्वास यामुळं ६०० किलोमीटर सायकल प्रवासाचा ताण जाणवला नाही, असा शालिनी सेवानी यांनी अनुभव सांगितला.

अमरावती शहरात गत दहा वर्षांपासून अमरावती सायकल असोसिएशनच्या माध्यमातून अनेक सायकलप्रेमींच छान संघटन झालंय. सायकल असोसिएशनच्यावतीनं चिखलदरा तर कधी मुक्तगितीपर्यंत सायकलपटू अनेकदा पोचलेत. यावर्षी पहिल्यांदा सायकलंन थेट पंढरपूर गाठण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे केवळ अमरावती सायकल असोसिएशनच नव्हे तर राज्यभरातील सर्वच जिल्ह्यातून सायकलपटू पंढरपूरच्या वारीत सहभागी झाल्याची माहिती अमरावती सायकल असोसिएशनचे सदस्य राजू महाजन यांनी दिली.